म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १५०५
१२०८
सप्टें १९६१

# सांगाती

अनिल

REFBK-0011984
REFBK-0011984

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत.
अनुक्रमांक 39626 वि. वि. काव्य
क्रमांक 3484 नों. दि. 29/1/69

REFBK-0011984
REFBK-0011984

# सांगाती

अनिल

११८८

मौज प्रकाशन
मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मौज प्रकाशन : ६०

पहिली आवृत्ति, २६ ऑक्टोबर १९६१

© १९६१, आ. रा. देशपांडे

वेष्टनावरील चित्र
द. ग. गोडसे

किंमत चार रुपये

मुद्रक :
श्री. वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

अनुक्रमणिका


*अनिल – एक अभ्यास* पांच

१. सांगाती १
२. आज अंधारी रात ३
३. स्वातंत्र्यचक्रप्रवर्तन ४
४. रुसवा ५
५. ओळख ६
६. अर्घ्य ७
७. गाठ ८
८. १९४७ ९
९. पर्यंत १३
१०. आम्ही १४
११. तहान १७
१२. प्रणाम १९
१३. जाग २०
१४. सारेच दीप कसे मंदावले आता २३
१५. अभिसार २६
१६. आंत २७
१७. मेघांची भूमि २८
१८. ओढ ३१
१९. अंत ३२
२०. झोप ३३
२१. स्वप्नें ३४
२२. हुरूप ३५
२३. क्षणभर ३६
२४. अर्थ ३७
२५. पीक ३८
२६. कोंबडा ३९
२७. रंभागर्भ ४१
२८. स्वप्नबीज ४२
२९. तटस्थ ४३
३०. पाहतों हें सर्व आम्ही ४४
३१. रानराणी ४६
३२. कधीचें क्षितिज ४७
३३. आई ४८
३४. आश्विन ५०
३५. विराणी ५१
३६. तदात्मता ५२
३७. एक दिवस ५३
३८. आणीबाणी ५४
३९. तळ्याकाठीं ५५
४०. खेळणीं ५६
४१. पावसाळी सांज ५७
४२. दोन वाटा ५८
४३. जुई ५९
४४. श्रावणझड ६०
४५. शरदागम ६१
४६. लावण्य ६२
४७. एकाकी ६३

४८. निर्वासित चिनी मुलास ६५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३२७२८ वि: काव्य
क्रमांक २५४५ २८।११।६९
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
११९८४

## अनिल — एक अभ्यास

अनिल गेलीं चाळीस वर्षें कविता लिहीत आहेत. या काळांत वेळोवेळीं मराठी कवितेच्या रूपरंगांत फेरबदल झाले. कांही वरवरचे तर कांही अंतर्याम ढवळून टाकणारे. मंद दृष्टींतहि भरतील इतके कांही ठसठशीत, तर कांही इतके सूक्ष्म की एकाग्र बुद्धीलाहि सायासाने उमगावेत. यांतील कोणत्या फेरबदलांचा स्पर्श अनिलांच्या कवितेला झाला, आणि तिच्या प्रभावाने कोणते फेरबदल घडून आले, हा विचार करण्यासारखा आहे. त्या प्रभावाची तीव्रता आणि व्याप असा कधीच नव्हता की ज्यामुळे अनिलांचा 'पंथ' व्हावा, 'घराणें' बनावें. त्यांचा गंडा बांधलेले चेले नाहीत; नवशिक्याला घोटतां येतील अशा खास लकबी त्यांच्यापाशी नाहीत. म्हणून 'फुलवात' या त्यांच्या पहिल्याच संग्रहामुळे (१९३२) वरिष्ठ श्रेणीच्या कवींत त्यांना स्थान मिळूनहि—आणि त्यानंतरच्या त्यांच्या कर्तृत्वाने त्याला बळकटी येऊनहि—त्यांना 'स्थान-माहात्म्य' लाभलें नाही. ते एकटेच राहिले.

या एकटेपणाचें हें तर कारण नसेल ना की ते चालत राहिले; त्यांनी वेळीच कृतकृत्यपणें बैठक मारली नाही. आसनाभोवती गण लौकर जमतो, प्रदक्षिणा घालतां येते, धूपदीपाचे संस्कार सहज घडतात. चालणाऱ्याला तें भाग्य कठीण. मागून दिंडी जाईल म्हणावें तर तिला मळलेली वाट लागते. या कवीला आवडते ती "वाट वळणाची...पायफसणीची... अडचणिची". 'हीच माझी वाट होती' अशी कवीची भावना आहे. अशी वेगळी, बिनसरावाची, वाट हा कवि धुंडीत आला; तो स्थिर झाला नाही. त्याने प्रयोग केले. त्यांतील कांही इतरांना पचले; सर्व नाहीत.

इतरांच्या प्रयोगांशीं त्यांचें नेहमीच जुळलें नाही. अशा एखाद्या प्रयोगाचें भाग्य हें की त्याची पाहतांपाहतां परंपरा झाली. पायवाट रुंदावून तिचा सपाट 'मार्ग' झाला; आणि तिला रहदारी मिळाली. अनिलांची एकलकोंडी वाट कधी अशा मार्गाला मिळालीच नाही. ती हुलकावणी देत व घेत नागमोडीने जात राहिली. अशा चालींतच एखाद्या कविप्रकृतीचें सार्थक असतें—की सर्वच कवींच्या? 'कवि हा फिरता बरा' असें समर्थांनी म्हटलें असतें कदाचित्.

अनिलांनी प्रयोग केले ते कवितेच्या बहिरंगाप्रमाणे अंतरंगांतहि. पहिल्या बहरांतील त्यांच्या प्रेमकवितेने त्या वेळच्या रसिकाला ओढून घेतलें तें आपल्या वेगळेपणामुळे. असा वेगळेपणा आजवर विविध तऱ्हेच्या कवितेंत त्यांनी टिकविला. पण साधारण वाचकाच्याच नव्हे तर अनेक शुष्क काव्यसमीक्षकांच्याहि मनांत घट्ट सांगड बसली आहे ती अनिल आणि मुक्तछंद यांची. त्याची अढीच झाली आहे; जणू मुक्तछंदापलीकडे त्यांनी कांही लिहिलें नाही, आणि तेवढीच त्यांची कर्तबगारी. मुक्तछंद हा काय प्रकार आहे व तो कां याविषयीच्या कल्पनाहि जरा मोघमच असतात. आणि बहिरंगाबाबतहि अनिलांनी आणखी प्रयोग करून पाहिले आहेत याची जाणीव नसते.

मुक्तछंदाचा आता मराठी डोळ्यांना (आणि कानांना, म्हणजे ज्या कानांना छंदभेद उमगतात अशांना) इतका सराव झाला आहे की पंचवीस वर्षांपूर्वी त्याने केवढा हलकल्लोळ माजविला होता याची सांगून कल्पना यायची नाही. विरोधकांतील अगदीच बाष्कळ आणि मठ्ठ होते ते सोडले तरी इतरांचे मुख्य आक्षेप असे की मुक्तछंद म्हणजे गद्यच आणि तो परस्फूर्त म्हणून मराठी परंपरेला विघातक आहे. त्यांचा निरास करतांना मराठी भाषेची मोडणी आणि पंडितपूर्व कवितेची घडण यांच्याशीं मुक्तछंदाचे लागेबांधे असल्याचा अनिलांनी निर्वाळा दिला. त्याने फार जणांचें समाधान झालें असें नाही. ओवी-अभंगांसारख्या खऱ्या मराठी छंदांचा लवचिकपणा वृत्तांच्या कोष्टकावर वाढलेल्या पढिक वाचकाला खरोखर मानवला नव्हताच.

जातिरचनाहि गौण, अथवा आपद्धर्मासारखी, समजणारी संस्कृत-निष्ठा अशी पाय रोवून बसली होती. आता परिस्थिति इतकी बदलली आहे, छंदमुक्ति येथपर्यंत गेली आहे, की अनिलांनी घालून दिलेले दोन प्रकार ('प्रेमजीवन' आणि 'मानवता') हेच कित्येकांना अकारण जखडलेले वाटतात!

मुक्तछंदाच्या गद्यत्वावर भर देणारे असें म्हणत की ज्यांना बद्ध-छंदाची शिस्त जमत नाही त्यांनी ही मुक्तछंदाची पळवाट काढली आहे. मुक्तछंद लिहिण्यास सोपा असा समज. तो असो वा नसो, अनिलांनी छंदःशास्त्र मान मोडून अभ्यासलें आहे. वृत्तजातींचीं लक्षणें, लगक्रम, उदाहरणें हें सगळें घटपट त्यांना मुखोद्गत आहे. तेंच एकंदर परंपरेविषयी. जुने मराठी कवि त्यांनी गोडीने वाचले आहेत. या रूढिभंजक कवीच्या प्रयोगांना परंपरेची बैठक आहे. इतकेंच की त्यांची परंपरेची कल्पनाहि रूढिभंजक आहे. कोण्या एके काळीं निर्माण होऊन आजवर तशीच अभंग राहिलेली ती परंपरा असें न मानतां प्रत्येक कलावंताच्या प्रयोगामुळे पुनर्घटित आणि समृद्ध होणारी तीच परंपरा. ती वाहती हवी, साचलेली नको. तो शब्दच बदनाम झाला आहे तो आपल्या कर्मठ पारंपरिकांमुळे.

कांही आधुनिकांचेहि संस्कार अनिलांवर झाले. त्यापैकी केशवसुतांचे विशेष आणि विविध. वासुदेव बळवंत पटवर्धनांनी आपल्या विदग्ध रसिकतेने अनेक तरुणांतील काव्यप्रेम फुलविलें; त्यांतील अनिल हे एक. पटवर्धन केशवसुतांचे अभिमानी; तो अभिमान अनिलांइतका त्यांच्या अन्य शिष्यांत उतरला असेल असें वाटत नाही. केशवसुतांना चिकटलेल्या 'रोमँटिक' या शब्दावर त्या वेळच्या कांही तरुण कवींचें जितकें प्रेम जडलें तितकें त्यांच्या कवितेवर जडलें नसावें. केशवसुतांचीं अस्सल वैशिष्ट्यें गोविंदाग्रजांसारख्या त्यांच्या चेल्यानेच अर्धीमुर्धी हरवून टाकलीं होतीं; उरलेलीं लौकरच त्या वाटेने गेलीं. राहिल्या फक्त 'आधुनिक कवितेचे जनक' इत्यादि आरत्या आणि मंत्रपुष्प. केशवसुतांचा आवेश पुढे कांहींनी उचलला. पण शब्दांचा गोडवा आणि रचनेची जिल्हई हीं अशा आवेशाशीं

विसंगत असतात ही जाणीव त्यांनी सहसा ठेवली नाही. तांबे-पंथाची नादनिष्ठा गाजूं लागल्यावर केशवसुती बाणा एकंदरीने वनवासी झाला. त्याची इमानाने संगत करणाऱ्या थोड्या कवींपैकी अनिल हे प्रमुख.

तरुण वयांत कवीचा पिंड भरत असतो तेव्हा त्यावर तऱ्हेतऱ्हेचे दाब पडतात—कांही हलके, कांही बळकट. त्यांची परस्परांशीं नेहमीच संगति लावतां येते असें नाही. कांहींच्या खुणा स्वच्छ आणि कायम राहतात; कांहींच्या शोधाव्या लागतात. कोण जाणे, खुद्द कवीलाच त्यांतल्या कांही पुसून टाकाव्याशा वाटत असतील. अनिलांच्या घडणीच्या काळांत—साधारणतः १९१५ ते १९२० पर्यंत—बालकवि आणि गोविंदाग्रज यांच्या प्रभावांतून—जबरींतून म्हणा हवें तर (कोणी काव्य-लंपट पोरगा) सुटला असेल असें वाटत नाही. पुन्हा त्या दोघांचे सहज सूर परस्परांशीं कित्येकदा विसंवादी; (केशवसुतांचाहि सच्चा सूर तिसराच;) पण प्रतिभेच्या किमयेने, त्या दोघांत कधी असा मेळ जमून येतो की असली फोड आणि चिकित्साच बदसूर वाटावी. अगदीच एकमार्गी कवि क्वचित्—म्हणजे खरा कवि. पाय फुटतांच डोळ्यांना झापडें आणि कानांना दट्टे बसवून घेणारा. अनिलांवरून आणखीहि कुणाकुणाचें वारें गेलें असेल? बींची चटकन् आठवण होते: बी केशवसुतांना गोविंदाग्रजांहून अधिक जवळचे. काव्याचा आचार आणि उच्चार यांबाबत ते इतर अनेकांहून अधिक आधुनिक; पण जुन्याचा कस पचविलेले; त्या जुन्यांत संस्कृतापासून लावणीपर्यंत सगळें आलें. अनिल व केशवसुत यांमधील बी हा एक घट्ट दुवा आहे.

पुढे अनिलांचा जो विकास झाला त्याचा आलेख पाहण्यासारखा आहे. ‘फुलवात’ मधील कविता १९३१ पर्यंतच्या; त्या सगळ्याच ‘प्रेमाच्या’: ओढ, हुरहुर, अधीरता, सफलतेची थरथर यांच्या आणि त्या अवस्थेला साजून दिसतील अशा आदर्शवत् प्रेमाच्या. त्यानंतर अनिलांनी ‘तसल्या’ कविता लिहिल्या नाहीत. लिहिल्या असत्या तर त्या संग्रहाने मिळालेलें यश दुणावत गेलें असतें. (आपलें वळण आपणच घोटत राहिलें म्हणजे इतर तें गिरवूं लागतात!) पण तें कवीच्या वाढीशीं विसंगत ठरलें

असतें—कृत्रिम झालें असतें. आपल्याकडे जो शालेय रोमँटिसिझम्, त्याच्या सोप्यासोप्या आडाख्यांसह, त्या काळीं पसरत होता (आणि अजूनहि ज्याचीं डबकीं कोठे कोठे घोंघावत असतात!), त्याअन्वयें कवित्वाला पंचविशीची सक्त मर्यादा होती. म्हणजे, तें वय उलटल्यावरहि तसें कांही न घडल्याचा भास चालू ठेवला पाहिजे! तीच कोवळीक, तोच हळवेपणा, तेच थेर. (मर्कटग्रंथी वापरून जवानी टिकविण्याचा शास्त्रीय प्रयोग तेव्हाच गाजला होता!) प्रौढ आणि वयस्कर कविता कशीशीच वाटे; कवीने वय चोरलें पाहिजे. तेंच 'चिर-तारुण्य'. म्हणून कलप लावलेली कविता तेव्हा पावलोपावलीं भेटे. प्रेमकवि अनिल 'फुलवात'-भोवतीच घोटाळत राहिले नाहीत; 'प्रौढत्वीं निजशैशवास जपणें' हा बाणा प्रेमापुरता तरी बाळगणाऱ्या कवींपैकी ते नव्हेत. प्रेमहि प्रौढ, घरंदाज आणि गडद होतें; नुसती फेसाळ खळबळ उठविण्याऐवजी खोल आणि विशाल अंतःप्रवाहासारखें तें अवघ्या संसाराला शीतळता देतें याची अनिलांच्या पुढील—'पेर्तेव्हां'तील आणि या संग्रहांतील—कवितांत पुरी साक्ष आहे. (त्यावरून आठवलें. हरींद्रनाथ चट्टोपाध्यायांनी गमतीने म्हटलें आहे की तरुणपणीं माणूस फक्त 'प्रेमांत पडतो', प्रौढपणीं तो 'प्रेम करतो'! त्यांनी तारुण्याची मर्यादा पन्नास वर्षांपर्यंत ताणली आहे तें सोडा!)

असल्या 'चिर-तारुण्या'चें वरदान अनिलांनी स्वतःला दिलें नाही. ते सगळ्या अंगांनी वाढत होते. त्यांत लपविण्यासारखें त्यांना कांही वाटत नसावें. 'फुलवात'नंतर तीन वर्षांनी त्यांनी 'प्रेम आणि जीवन' ही मुक्तछंदांतील दीर्घ कविता लिहिली आणि ती लगेच प्रसिद्धहि झाली. त्यानंतर तीनच महिन्यांनी लिहिलेलें 'भग्नमूर्ति' हें मुक्तछंदांतील खंडकाव्य मात्र पांच वर्षांनंतर प्रसिद्ध झालें. 'फुलवात'च्या कवीने ह्याहि कविता लिहिल्या हें तेव्हा कित्येकांना खरेंच वाटेना. एक तर मुक्तछंद: 'फुलवात'च्या शेवटीं त्यांतील कांही गीतांचें स्वरलेखन देणाऱ्या—आणि ज्याच्या कांही गीतांच्या तबकड्या लोकप्रिय झाल्या त्या—कवीने असें

करावें ? तिकडे काणाडोळा केला तर कवितेच्या ऐवजाचें काय ? 'प्रेम आणि जीवन'चा विषय तरी 'काव्यमय' होता—अगदी रोमॅटिकच ; पण 'भग्नमूर्ति' ही नांवांत जाहीर केल्याप्रमाणेच उघडउघड भंगलेल्या मूर्ति, देवळें इत्यादीसंबंधी होती. पुस्तक बांधणीपासून सुंदर असलें तरी तें उघडल्यावर एखाद्या जीर्ण वस्तुसंग्रहालयाचा 'कॅटलॉग' पाहत असल्याचा भास व्हावा अशीं पानपानभर चित्रें त्यांत होतीं. खुद्द कवितेंत तसलीं भयानक नांवें होतीं. आणि अशा मोडक्या मूर्तींपासून आणि अतिप्राचीन इतिहासापासून काय काय बोध घ्यावयाचा त्याचें ठणठणीत प्रवचन होतें! 'प्रेम आणि जीवन'देखील प्रवचनापासून सुटलें नव्हतें! बोधवादांतून नुकतीच मराठी कवितेची सुटका झाल्याचें शुभवर्तमान नीटसें फैलावलें नाही तोंच काय हें ?

भावनेचें क्षेत्र काव्याला आंदण देऊन विचाराचा प्रपंच गद्याच्या हवालीं करणारी वाटणी समजूतदार म्हणून सर्वमान्य होऊं पाहत होती. भाषे-बाबतहि थोडीशी तसलीच फारकत धरून चालणारे पुष्कळ होते. 'गद्याची भाषा' कवितेंत आली अथवा कविता 'वैचारिक' दिसली की ती नकोशी वाटे. 'बोधाचीं गाणीं' गाणारे पूर्वीचे कवी हेहि वैचारिकच असा समज होता. कवितेंतला विचार हा भावनेशीं एकजीव किंवा तिच्यांत संक्रांत झालेला असतो हें त्याचें निराळेपण पाहिलें जात नसे. तेंच बोधाचें. 'प्रेम आणि जीवन'मधील विचारांत असली तिडीक आहे की गद्य विधानांहून त्याचें तपमान अधिक आहे हें चटकन् उमगतें. 'भग्नमूर्ती'तील संस्कृति-रक्षणविषयक बोध अधिक उघड, क्वचित् बटबटीतहि, वाटला तरी मूलतः तो काव्यविषयांतच अंतर्भूत आहे; किंबहुना तोच काव्यविषय आहे. तो विचार वर्षानुवर्षांच्या व्यासंगांतून आणि तळमळींतून स्फुरला आहे; मग तो पटो वा न पटो. त्याचा उच्चार सौम्य आणि रुचिर व्हावा म्हणून त्यावर कसलें तरी काव्यमय पुट चढवितां आलें असतें; पण रोखठोकपणांतच त्याचें विशिष्ट बळ आहे ; तें अशा आडवळणी शब्दांतून विखरून गेलें असतें. एका आर्ष विषयावरील कवितेला आर्ष वाणीची ही रग अनुरूप आहे.

...ठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३९७२७ वि: काव्य
क्रमांक १५८५ नों: दि: २९/११/६१

तेंच १९४३मध्ये प्रसिद्ध झालेल्या (आणि या संग्रहांत समाविष्ट केलेल्या) 'निर्वासित चिनी मुलास'चें. तशा एका मुलाचें छायाचित्र कवीने कोठे पाहिलें; त्याचे 'कावरेबावरे भेदरलेले' डोळे असे बोलके होते की त्यांनी कवीला अति बेचैन केलें. तो काळच असा की मट्ठ आणि मुक्त या दोन जातींचीं माणसें सोडल्यास इतरांना दूर पेटलेल्या वणव्याची आंतवर झळ लागत होती. युद्धाच्या दैनंदिन चढउतारांवर त्यांचा जीव टांगला होता. हें कोणतें शिळोप्याच्या इतिहासांतील शिकंदर आणि पोरस यांतील अथवा अमेरिकेंतील यादवीचें युद्ध नव्हतें. तें आजचें होतें; त्याच्या निकालावर उद्याचें नशीब अवलंबून होतें. प्रत्येकाच्या भावना त्यांत गुंतल्या होत्या. आणि या भावना पोकळ व केवळ 'स्वार्थी' नसून दीर्घ आणि उत्कट विचाराचें तें चैतन्यमय रूप होतें. हें अमानुषतेने बुजबुजलेलें जीर्ण जग कोलमडत आहे, त्याच्या जागीं सुंदर नवें जग उभें राहील ही निष्ठा त्या कवितेने बोलून दाखविली आहे; तसाच युद्धपिसाटांचा आणि नफेबाजांचा जळजळीत निषेधहि. 'पेर्तेव्हा' (१९४७) या संग्रहांत दुसऱ्या महायुद्धांतून आणि त्याची कृष्णच्छाया पडलेल्या परिस्थितींतून स्फुरलेल्या सुमारे दहा कविता आहेत. याहि संग्रहांत कांही कविता अशा आहेत की ज्यांचा विषय कवीभोवतालच्या जगाचीं सुखदुःखें हा आहे. अशा कवितेवर 'सामाजिक', 'प्रचारात्मक' इत्यादि शिक्के मारून तिला हिणकस ठरविण्याची फॅशन या पंधरा वर्षांत रुळली आहे—पद्धतशीरपणें रुळविली जात आहे.

पुन्हा पंचवीस-तीस वर्षें मागे गेलें पाहिजे. त्या काळीं नव्या राजकीय विचारांची एक अत्यंत मोठी प्रबळ लाट आली; हजारो तरुण त्यांत न्हाऊन निघाले. त्यांना नवें जग हवें होतें; त्याचे आराखडे त्यांच्या डोक्यांत थैमान घालीत होते; आणि या नव्या आणि जुन्या जगांच्या लढ्याची, व्यक्तीच्या सामाजिक संबंधांची, ज्याला जाणीव नाही आणि म्हणून जें ती वाचकांना देऊं शकत नाही तें साहित्य कुचकामी किंवा प्रतिगामी आणि ती जाणीव प्रखरपणें असणारें आणि देणारें ते पुरोगामी अशी सुटसुटीत

फाळणी त्यांनी केली. साहित्य लढाऊ असावें—क्रांतीच्या शस्त्रासारखें—अशी त्यांची श्रद्धा. युरोपांतून—विशेषतः इंग्लंडांतून—ही विचार-प्रणाली येथे आली. त्या दशकाच्या शेवटीं शेवटीं, म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या आरंभीं, उलट वारें वाहूं लागलें; प्रथम अर्थात् युरोप-अमेरिकेंत, आणि मागोमाग या देशांत. राजकीय प्रवाह बदलल्यामुळे वारें बदललें. जें प्रतिगामी होतें तें एकाएकी पुरोगामी झालें—माणसें आणि साहित्य. तींच माणसें त्याच शिरा ताणून नेमकें उलट ओरडूं लागलीं. एका रंगाचे ठोकळे जाऊन दुसऱ्या रंगाचे (किंवा बिनरंगाचे) ठोकळे लोकप्रिय झाले. साहित्य हें केवळ प्रचाराचें साधन आणि तेंहि राजसत्तांकित करूं पाहणारा हडेलहप्पी विचार हटत गेला; आणि प्रचार, साहित्यांतील 'सामाजिक जाणीव', 'दलितांविषयी सहानुभूति' इत्यादींनी पित्त उठणारा कलावाद पुन्हा वर आला. या वादाला धनसत्तेचा आश्रय वर्ज्य नाही हें पुढे स्पष्ट झालें.

दरम्यान राष्ट्रीय चळवळीचा जोर वाढत होता, आणि तिच्यांत बेचाळीसचा आवर्त निर्माण झाला. त्याने कुसुमाग्रजांची कविता चढली; ज्या भावनांनी आणि विचाराने देशाला भारलें होतें त्यांनीच त्या कवितेलाहि भारलें होतें. ती चढविलीहि गेली. श्रीकृष्ण पोवळ्यांच्या तशा कवितेचेंहि तेंच. यांत मौज अशी की ज्या टीकाकारांनी ही भडक तारीफ चालविली होती त्यांना तत्त्वतः तसली कविता मान्य नव्हती! राजकीय आकांक्षा, सामाजिक दुःखें वगैरे विषय त्यांना काव्यबाह्य ठरवायचे होते! असले विषय म्हणजे प्रचार, म्हणजे कृत्रिमता, असें त्यांच्या नव्या पाठ्य पुस्तकांतील समीकरण होतें. पण त्या काळाचा महिमा म्हणून, किंवा आणखी कांही कारणाने, त्यांनी तसल्या विषयांवरील कवितेचा उदोउदो केला. मथळेबाजी माजली; विशेषणांना अर्थ उरला नाही. नावीन्याच्या सोसाने 'क्रांति', 'रक्त', 'अग्नि' असला गरम मसाला वापरून झगझगीत विशेषणें बनविलीं गेलीं. या सगळ्याचा इतका अतिरेक झाला की अगदी भाबडे वाचक सोडल्यास इतरांचें मन कलुषित व्हावें. 'अहि-नकुल'-

मधील सापमुंगुस कोण याचा राजकीय अन्वय तावातावाने आणि तपशिलाने जाहीर होऊं लागला. 'गर्जा जयजयकार' या सरळसोट गीतावर शब्दबंबाळ भाष्यें झालीं. पण हा ताप चढला तसा एकाएकी उतरला. इतकेंच नव्हे तर जणू घडलेल्या पापाचें क्षालन म्हणून या जातीच्या टीकाकारांनी यापुढे असल्या कवितेला ओवळी मानण्याचें व्रत घेतलें. लढाई संपली. बदललेल्या जागतिक परिस्थितींत त्या व्रताचें माहात्म्य वाढलें, अजून वाढत आहे; वाढविलें जात आहे. कवीच्या आंत काय घडतें तेंच महत्त्वाचें; त्याच्या भोवती काय घडतें तें गैरलागू; त्याची दखल घेणारा तो अकवि. परिस्थितीचें सोयरसुतक कवीला नसावें. तो तिच्यापासून अलिप्त असतो—आणि मुक्त. जसा एखादा अवलियाच. याची उजळणी एकसुरांत चालू असते. सामाजिक आणि राजकीय क्रांतीला विषय म्हणून साहित्यांत मज्जाव असावा, साहित्यिकाला अन्यायाची चीड येऊं नये (स्वतःवरील अन्याय सोडल्यास), परदुःखाची आंच त्याला लागूं नये—थोडक्यांत साहित्यांत असला 'प्रचार' नसावा—याचा प्रचार मात्र तऱ्हेतऱ्हेने होत असतो.

म्हणून केशवसुतांच्या मोठेपणाला 'तुतारी' हा डाग मानायचा! बालकवि हे 'शुद्ध' सौंदर्याचे कवि! (त्यांचा 'धर्मवीर' विसरणें एकंदरींत सोपें जातें.) बालकवि 'तुतारी' तल्लीनपणें वाचून दाखवीत आणि त्यांनी ती अनेकांच्या मनावर ठसविली हें किती जणांना ठाऊक आहे? अनिलांनी 'प्रेमाच्या कविता' लिहाव्यात, द्वेषाच्या लिहूं नयेत, हा याच संप्रदायाचा अभिप्राय. राष्ट्रीय हर्षाच्याहि नकोत, तो सर्व लोकांचा! कवीचें माणूसघाणें वेगळेपण त्यांत कोठे उरलें?—म्हणून तोहि बाद. आपल्या स्वातंत्र्यप्राप्तीने थरारून जाऊन कोणीं कविता लिहिली की लग्नमुंजीवरील कवितेइतकीच ती मंगल मानणारी करंटी काव्यदृष्टि आपल्या माहितीची आहे. जगाविषयीहि तीच वृत्ति. 'निर्वासित चिनी मुलास' या अनिलांच्या दीर्घ कवितेकडे तेव्हा कोणाचें लक्ष वेधलेंच नाही. कोण चिनी मुलगा? मला काय त्याचें? वस्तुतः कुसुमाग्रजांचें 'जा जरा पूर्वेकडे' युद्धग्रस्त चीनविषयीच आहे. पण वर्षभरांत दृष्टि पालटली...

अर्थात् अमुक विषय काव्यहीन असें मानणें जेवढें चुकीचें तेवढेंच तमुक विषय हमखास काव्यमय असें मानणेंहि. पूर्वी 'राष्ट्रीय' आणि तत्सम कविता तेवढी सोज्वळ, बाकी केवळ 'रंडागीतानि' असा दावा असे; पण ती राष्ट्रीय अथवा उपदेशात्मक कविता आणि कुसुमाग्रजांची वा अनिलांची यांतील अंतर इतकें उघड आहे की त्यावर लिहिणें अनावश्यक आहे. हा काव्य-अकाव्यांतील फरक आहे; 'प्रेमाच्या' कवितांतहि—एकंदरीने 'आत्मनिष्ठ' म्हटल्या जाणाऱ्या कवितांतहि—तसा फरक असूं शकतो. राजकारण-समाजकारणावरील कविता भावगीतात्मक असूं शकते हें पुन्हा सांगण्याची वेळ आली आहे.

ज्या कवितेंतील 'राजकीय' अथवा अन्य विचार कवितेने आत्मसात् केलेला नाही—जो केवळ तार्किक विचार राहिला आहे, जो कवीच्या नसांतून खेळलेला नाही—तें नुसतें पद्य. वृत्तरचनेचे चमत्कार दाखविण्या-करिता—अथवा प्रतिमांचे—लिहिलेली कविताहि तसलीच, मग तिचा विषय कोणताहि असो. पण केशवसुतांनी 'तुतारी' 'स्वप्राणाने' फुंकली; 'क्रांतीचा जयजयकार'मध्ये कुसुमाग्रजांच्या ध्येयनिष्ठेचें ओज आहे आणि अनिलांच्या 'निर्वासित चिनी मुलास'सारख्या कवितांत या त्यांच्या ध्यासाचा सहज उच्चार आहे. सहजता एवढी की त्यांत किमान अलंकरण आहे—प्रतिमाहि फार थोड्या. जें पिळवटून निघालें आहे त्याला भाषेची छानछोकी विशोभित दिसली असती. येथील भाषा साध्यांत साधी, बोलल्यासारखी आहे. कुसुमाग्रजांवरील अन्य कवींच्या संस्कारांमुळे त्यांच्या असल्या कांही कवितांच्या भाषेचा साज अकारण संपन्न म्हणून थोडासा विसंगत झाला. अनिलांच्या 'भग्नमूर्ती'तील गद्यप्राय भाषेला तेव्हाच्या वाचकांनी नाकें मुरडलीं; 'निर्वासित चिनी मुलास'ची भाषा त्याहूनहि मुंडी आहे. संस्कृत शब्दांचें वजन आणि नाद यांचा उपयोग आणखी कमी केला आहे. कित्येकदा ते वापरले आहेत ते उपरोधाला उठाव देण्यासाठी; क्वचित् इंग्रजी शब्दांचे सुटसुटीत पर्याय म्हणून. अनिलांच्या कवितेंत नेहमीच—अगदी आरंभापासून—संस्कृत आणि बोलभाषा यांचें

मिश्रण होतें—क्वचित् विक्षिप्त वाटण्यासारखें; पुढे पुढे तसेंच कारण असल्याशिवाय संस्कृताचा वापर कमी कमी होत गेला. काव्याच्या भाषेविषयी गेल्या पंधरा वर्षांत पुष्कळ फेरविचार झाला. मर्ढेकर, रेगे इत्यादींच्या प्रयोगांनी त्या विचाराची कांहीशी सांगता झाली; त्याला अधिक बळहि आलें. पण याचा अर्थ असा नव्हे की 'काव्यमय' शैलीविषयीच्या जुन्या कल्पना अगदीच हटल्या. 'सुंदर' शब्दपंक्ति बनविण्याच्या हव्यासांतून न सुटलेले नवकवीहि आहेत! 'झिजलेलीं विशेषणें' हा शब्दप्रयोग टीकाकारांत आणि संतुष्ट कवींत इतका लोकप्रिय झाला आहे की तोच थोडा झिजल्यासारखा झाला आहे; पण बारकाईने पाहिलें तर तशीं विशेषणें, कधी किंचित् 'मेक-अप' करून, मिरवीत असतातच. पुष्कळ वाचकांना अशा रंगीत विशेषणांमुळे कदाचित् नवता सुसह्य होत असावी! अनिलांनी नेहमीच विशेषणांचा उपयोग हात राखून केला; अलीकडे तर अधिकच; आणि वापरलीं तींहि काटेकोरपणें.

काव्याच्या भाषेबाबत अनिलांनी विविध प्रयोग केले. 'फुलवात'मध्ये ते अडखळत केले आहेत. गद्यप्राय रचना आणि शब्द यांचा वापर मधूनमधून दिसतो; पण कित्येकदा त्यांच्या संगतीला 'काव्यमय' शब्द आणि रचना आढळतात. रसायन नेहमीच जमलेलें नसतें. मुक्तछंदाने बद्ध-छंदाची चौकट मोडली, त्यामुळे केवळ ओळीच लवचिक झाल्या नाहीत तर भाषाहि नवीन तऱ्हेने वळविण्यास संधि आणि ईर्ष्या मिळाली. वृत्तांतील लगक्रम मोठा कर्मठ. अक्षरांना हातपाय हलवायला त्यांत जागा नसते; जातींत प्रत्येक अक्षर जखडलेलें नसलें तरी मात्रांचे तुकडे लिहिणाऱ्याच्या आणि वाचणा-ऐकणाऱ्याच्या मनांतहि असे घट्ट बसलेले की उर्दू गजलाप्रमाणे कित्येकदा चलाख श्रोत्याला शायराबरोबरच उत्तरार्ध गुणगुणतां येतो! हा कांहीसा काव्यसंकेताचा गुण, आणि कांहीसा भाषेच्या संकेतांचा—म्हणजे तेथे जणु ओघांतच आणि सवयीने ठराविक शब्दपंक्ति येते. कवि तसाच मनस्वी असल्याशिवाय ओघाविरुद्ध जात नाही. ओवी-अभंगासारख्या अक्षरछंदांत बरीच मोकळीक असते; पण मोकळीक म्हणजे स्वैरपणा या

संशयामुळे आधुनिक कवितेंत परमेश्वरापलीकडे इतर विषयापार त्या छंदांना कोणीं फारसें जाऊं दिलें नाही. परमेश्वराला, अर्थात्, जुन्या संतांमुळे त्यांची सवय जडलेली असते! त्या छंदांची प्रतिष्ठा अलीकडे पुन्हा थोडीशी वाढली आहे ती मर्ढेकरांनी लौकिक विषयासाठी त्यांचा उपयोग केल्यापासून! मुक्तछंदाने ओवी-अभंगांची चपळता उचलली, पण त्यांच्या रचनेची ठरीव बांधणी मानली नाही—आणि त्यांच्यामागील भावसंकेत तर टाळलेच! या सगळ्या कमीअधिक बांधलेल्या पद्यप्रकारांत नकळत शब्दांच्याहि चाकोऱ्या पडत; ज्यांना चाकोऱ्या सुखावह आणि बिनधोक वाटतात अशा पद्यकारांनी राजीखुषीने त्यांतून आपली गाडी हाकलली. तेवढ्यापुरती चलाख कसरत. तशा तब्बेतीच्या टीकाकारांनाहि तें फार पसंत. त्यांच्या हिशेबीं 'खडबडीत' शैली हा घोर अपराध—जशी केशवसुतांची, अथवा गद्यांत डॉ. केतकरांची. हिसकेगचके नकोत; गुळगुळीतपणा हवा. अपेक्षाभंग करणारे शब्द जिवाला त्रास देतात. वस्तुतः अशा अपेक्षाभंगांतून नाट्य निपजतें. पण या नाट्यगुणाचा आधुनिक मराठी कवितेंत फारसा सुकाळ नाही. अपवादादाखल चांगल्या नवकवितेचा उल्लेख केला पाहिजे.

गेल्या दोनतीन पिढ्यांत आपल्या साहित्यांत कित्येक क्रांत्या घडल्याच्या, कित्येक कोंडी फोडल्याच्या, वार्ता आपण ऐकत आलों आहोंत. त्याची शहानिशा येथे नको! पण अजूनहि अनेकांचें काव्यपरीक्षण ओळींची लांबी मोजणें, यति आणि यमकें तपासणें, व्याकरण आणि भाषा यांतील दोष हुडकणें यापलीकडे जात नाही. काव्यांतील 'श्रेय' धुंडण्याच्या होषांत एखादा सत्कवि हे सर्व नियम-पोटनियम धुडकावून देईल हें पटत नाही. यमकाचा काच सैल झाला तोहि केवढया बखेड्यानंतर. काव्यशक्तीच्या अनिरुद्ध दाबामुळे बद्धछंदांतील एखादी ओळ लांबली तर तिने अर्थाला, सगळ्या कवितेला, उठाव येतो हें जाणून न घेतां कवीचें वृत्तज्ञान कच्चें, असा पंतोजी-शेरा देणारेच फार. तेंच यतींविषयी, ओळींतील विरामांविषयी, शब्दसंक्षेपासाठी घेतलेल्या व्याकरणाच्या सवलतीविषयी, आणि

अर्थोत्कटतेसाठी बोलींतून उचललेल्या ('अशिष्ट') अथवा नवें रूप दिलेल्या अथवा जोडलेल्या शब्दांविषयी. जुन्या (म्हणजे पंडिती) कवीचें नांव सांगणाऱ्यांनी हें केलें तर तें समजूं शकतें; पण इंग्रजी कवितेचे ऊठसूट दाखले देणाऱ्यांनीहि तें करावें हें चमत्कारिक वाटतें. तिच्यांत एवढे विलक्षण आणि तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग झाले आहेत—गेल्या पांचपन्नास वर्षांतच नव्हे, तर फार पूर्वीपासून. शेक्सपिअर आणि मिल्टन यांसारख्या त्यांच्या दैवतांनीहि ते केले आहेत. आपल्या आधुनिक साहित्यावर इंग्रजीचे फार खोल परिणाम झाले आहेत, हा दावा कधी तरी नीट तपासून घेतला पाहिजे. एकंदरीने परीक्षार्थी अथवा भाषांतरार्थी इंग्रजीच फार. अगदी ताज्या इंग्रजी पुस्तकांतला वा नियतकालिकांतला ऐवज फुगवून मराठींत मांडणारा अथवा तिकडचीं आजचीं नांवें प्रौढीने तोंडांत वा लेखणींत घोळवणारा विद्वान् जरा टिचक्या मारून पाहायला हवा.

वर जो खडबडीतपणा म्हटला तो ब्राउनिंग या इंग्रजी कवींत ठायीं ठायीं आढळतो. वासुदेव बळवंत पटवर्धनांचा ब्राउनिंग मोठा लाडका! अनिलांत तें प्रेम आलें. खुद्द ब्राउनिंगच्या 'रोमँटिक' प्रेमप्रकरणाचीच पटवर्धनांच्या इतर शिष्यांना अधिक गोडी लागली असावी असा माझा कयास आहे. किचकट विषय आणि कधी वातड बनणारी बोलभाषा हीं ब्राउनिंगचीं वैशिष्ट्यें त्यांना नकोशीं वाटलीं. अनिलांच्या प्रकृतीला तीं थोडीशीं मानवलीं. 'प्रेमाचा आशावाद' तिकडूनच आला का? त्याच ब्राउनिंगने नितळ प्रेमगीतेंहि लिहिलीं हें आठवतें. शेक्सपिअर शिकविण्या-बद्दलहि पटवर्धनांची मोठी ख्याति असे. शेक्सपिअरच्या पूर्ण विकसित शैलींतील साधेपणाचें मर्म त्यांनी या शिष्याला समजावून दिलें असलें तर तें व्यर्थ गेलें नाही. पटवर्धनांचें आणखी एक दैवत म्हणजे तुकाराम: त्याच्या संतपणापेक्षा त्याचा विचार आणि कवित्व. त्या रोखठोक जिवंत वाणीची छाप अनिलांवर निश्चित पडली असणार. 'सांगाती'ला हाक मारणारा, तसा त्याच्याशीं फटकळ तंटा करणाराहि तुकारामच!

संतमंडळाविषयी बोलायचें म्हणजे तेवढाच ठणठणीत रामदास आहे; पण

तें भगवेपण या ‘मुमुक्षु’ नसलेल्या आणि ‘अजून यौवनां’त असलेल्या कवींत कोठे ओळखूं येत नाही. ज्ञानेश्वरांची पताका अनिलांनी निष्ठेने मिरविली; त्याने या ‘जीवनीं आसक्त’ असलेल्या माणसालाहि ‘थोडीसी ताटी’ उघडली असेल! प्रतीतिधर्माची वृत्ति (‘गूढगुंजना’ऐवजी तो शब्द अनिलांनी ज्ञानेश्वरींतूनच घेतला) आणि माधवराव पटवर्धनांनी केशवसुतांविषयी लिहितांना ज्यांची ‘चमत्कृतिजनक परस्परविरोध’ अशी हेटाळणी केली त्या ‘फुटे शब्द निःशब्दाला’ धर्तीच्या लौकिक-पार प्रतिमा हा ज्ञानेश्वरांचा प्रसाद. तसल्या लकबवजा प्रतिमा ‘फुलवात’-नंतर विरळ झाल्या, तरी त्यामागील विशिष्ट प्रतीकात्मता अनिलांत भिनून गेली. ज्ञानेश्वरांची शैली अलंकारसंपन्न, आणि डौलदार. तुकारामाहून किती वेगळी. त्या दोहोंचे संस्कार अनिलांच्या कवित्वावर झाले. तसा संकर ओळखूंहि येतो; पण अशा विरोधी विशेषांच्या एकत्र न्यासांतून कधी वेगळें सामर्थ्यहि येतें.

गेल्या दोन वर्षांत अनिलांनी दहा ओळींची एक नवी बांधणी करून पाहिली. तसल्या कांही कविता या संग्रहाच्या शेवटीं आहेत. सुनीत हा प्रकार आपल्या परिचयाचा आहेच. इंग्रजींतून त्याबरोबर त्याच्या दोन मुख्य पोटजातीहि आपण घेतल्या. एकींत शेवटच्या सहा ओळींत आणि दुसरींत शेवटच्या दोन ओळींत निराळी गति मिळते. दोहोंचा यमक-क्रम बराचसा ठरलेला आहे; त्यामुळे सुनीत बांधेसूद होतें अशी कल्पना. ही दशपदी लांबीने लहान; यमकाच्या साखळीने ती एकत्र बांधली जात नाही, कारण तशा त्या पांच स्वतंत्र द्विपद्या असतात. तिची एकात्मता अंतर्गत असते. भाववृत्तीचें एकाग्र चित्रण करणाऱ्या या आटोपशीर कवितांत निसर्गाचा तपशील असला तरी तो वृत्तीच्या अंकित असतो, आणि या वृत्तीचा उच्चारहि अतिसंयमित असतो. भावना आणि भाषा या दोहोंचाहि फुलोरा टाळला आहे.

पण या प्रयोगांचें तांत्रिक अंग बारकाईने पाहण्यासारखें आहे. प्रत्येक ओळ स्वयंपूर्ण असते—म्हणजे स्वतंत्र वाक्य; पण शेवटीं पूर्णविराम

नाही. क्वचित् स्वल्पविराम; आणि शेवटीं उद्गारचिन्ह. बहुतेक कवितांत शेवटीं सौम्य खटका आहे ('कलाटणी' म्हणण्याइतका तो तीव्र नाही.) म्हणून उद्गारचिन्ह असावें. दर ओळीच्या शेवटीं पूर्णविराम असता तर व्याकरणांतील 'विरामचिन्हें' या (इंग्रजींतून घेतलेल्या) प्रकरणाचा मुलाहिजा बाळगल्यासारखें झालें असतें खरें, पण त्या बिंदूमुळे कवितेचे ओळवार काप पडून तिच्या ओघाला बाध आला असता. हा ओघ डोळ्यांऐवजी कानांना जाणवला पाहिजे; आणि डोळ्यांच्या सोयीसाठी छपाईने पुरविलेल्या चारपांच विरामांपेक्षा किती तरी अधिक आणि सूक्ष्म विराम कानांना उमगतात. त्यासाठी कवीच्या तोंडून त्या कविता ऐकाव्यात—निदान तादात्म्याने आणि जाणकारीने स्वतःशीं मोठ्याने वाचाव्यात.

गेल्या चाळीस वर्षांतील इंग्रजी कवितेंतील छंदोरचना व भाषा यांवर ज्याचा दांडगा प्रभाव पडला त्या जेरर्ड मॅनूली हॉपकिन्सने "माझी कविता डोळ्यांनी वाचूं नका, कानांनी वाचा" असें कळकळीने पुन्हापुन्हा म्हटलें. शाईत गोठलेल्या शब्दाला आणि शब्दसंहतीला जिवंत वाणीच चैतन्य देईल. पद्याच्या लेखी अंकगणितांत एक किंवा दोन अशा पूर्ण मात्राच मोजण्याची सोय असते, पण त्याशिवाय मात्रेचे—कविवाणी तेवढी तरल असली तर—अनेक अपूर्णांक संभवतात; एखाद्या अक्षरावरचा आघात वाढवितां अथवा लांबवितां येतो; एखाद्या अक्षराला स्पर्श केला न केला असा निसरडा उच्चार करतां येतो; आणि, वर म्हटल्याप्रमाणे, विरामाची विविधता साधते. म्हणून लयसुद्धा ढोबळ आणि यांत्रिक न होतां अर्थाच्या उमाळ्याप्रमाणे ती हेलकावे घेते, सळसळते. जुनीं गीतें आणि बाळगाणीं यांत अशी मूळ ठेका घट्ट पकडून रचनेची स्वैरता असते; लावणींत तर लयीचे नाचरे खेळ असतात. निसरड्या, लाडिक अक्षरांनी तिला निराळीच ढंगदार रुचि येते. या दशपद्यांतील एखाद्या ओळींतील मात्रा चाळीसपर्यंत भरतात; कित्येकांत त्या तिसाहून कमी आहेत. पण त्या नेहमीच्या गणतीने. अनिलांच्या अर्थानुसारी आणि लयदार वाचनांत तो

फरक जाणवत नाही. 'पेर्तव्हा' या गीतावरील टीपेंत अशा वाचनांत ठसका कसा येतो तें सांगितलें आहे.

अनिलांच्या काव्यवाचनांत हा ठसका आहे; पण तो काव्यगायनाच्या जमान्यांतील तबलापेटीची मर्जी सांभाळून जमविलेला ठसका नव्हे. त्यांत सहजता असते; सूर बोलण्याचाच, पण जरा अधिक गहिरा. त्यांत निष्कारण आर्तता नाही की तारस्वरांची आदळआपट नाही. लयींतून आणि स्वरांतून भावना उमलायला हवी; विचाराची धार जाणवायला हवी. गद्यप्राय ओळी 'नुसत्याच' वाचतांना विरस करणाऱ्या वाटतात—कारण गद्यालाहि लय आणि बंदीश असते हें आपण विसरलों आहोंत. पद्याची अधिक रेखीव आणि गद्याची अधिक विस्कळीत लय या एकत्र गुंफल्या तर कधी कवितेंतील ताण सैल होतो, तर कधी त्यांच्यामधील विरोधाने उठाव येतो. चांगल्या मुक्तछंदांतहि—तो फारच 'बद्ध' नसला तर—तिला वाव असतो. अलीकडच्या अनेक कवींनी तिचा उपयोग केला आहे.

या दशपद्यांत, आणि एकंदरीने अलीकडच्या कवितांतहि, अनिलांनी वापरलेलीं यमकें बारकाईने पाहण्यासारखीं आहेत. रूढ यमक म्हणजे शेवटचें अक्षर व त्यापूर्वीचा स्वर यांची पुनरावृत्ति. तशीं यमकें, अर्थात्, आहेतच; पण 'फुलवात'नंतर तीं कमी कमी होत गेलीं. याहून निराळे प्रकार तऱ्हेतऱ्हेचे आहेत: केवळ शेवटच्या अक्षराचें यमक हा एक. दुसरा, "लागलें–लागल्या" ('पीक') "रांग–रंग" ('मेघांची भूमि'), "काळोख–ओळख" ('ओळख') असली कांही स्वरव्यंजनांची क्रम बदलून पुनरावृत्ति. क्रियापदांचें यमक या कवितांत वारंवार येतें; तेंहि तेवढेंसें रूढ नाही. कदाचित्, गद्यांतील शब्दांचा निदान क्रम बदलल्याशिवाय त्याचें पद्य होत नाही या समजुतीमुळे ओळीशेवटीं क्रियापद फारसें पाहावयास मिळत नसावें! अनिलांच्या कवितेंत विशेषणाचें स्तोम कमी; परिणामीं क्रियापदावर बराच भार, म्हणून जोर असतो. तोच शब्द पुन्हा वापरल्यामुळे बनलेलें यमक शिष्टमान्य नाही, तेंहि येथे आहे. 'सारेच दीप कसे मंदावले आता' या साठ-ओळींच्या कवितेंतील सव्वीस ओळींच्या अंतीं 'आहे'

किंवा ' नाही ' आढळेल. आणि ' आज अंधारी रात 'च्या अकरा ओळींत सात ' आहे ' व एक ' नाही ' आहेत! लोकाभिरुचि लक्षांत घेतां हें धाडसच म्हणायचें! मुक्तछंदाने यमकाचें बंधन झुगारलें याचा तेव्हा केवढा निषेध झाला होता! त्याची वकिली करणाऱ्यांना नियमक रचनेची कटाक्षाने तरफदारी करावी लागत असे. त्या लहानशा बंडाचा अर्थ एवढाच होता की, यमकाची सक्ति असूं नये; तें त्या त्या कवितेच्या स्वरूपावर अवलंबून असावें. यमकबंदीचा प्रचार कोणीं केला नाही; अनिलांनी नाहीच. म्हणून मुक्तछंदाच्या या प्रमुख प्रवर्तकाने आता मुक्तछंदांतहि यमकें वापरलीं तर त्यांना उपरति झाली असल्याचा कोणीं संशय घेऊं नये.

शब्दांतील नादाचा उपयोग करण्याचा यमक हा सरळ, आणि धोपट मार्ग आहे; पण इतरहि अनेक आहेत. आणि त्यांच्या मोहिनींतून कवि सहसा (आणि जाणतां अजाणतां) सुटत नाहीत. नादांतून अर्थाची रंगत वाढते, कल्पनाशक्तीला जाग येते. कधी नाद आणि अर्थ यांमधील रेषा पुसली जाते, आणि नादाला जणू स्वतःचा अर्थ फुटतो. बोरकरांच्या उत्कृष्ट कवितांत ही किमया घडते. यमकाप्रमाणे अंतर्गत यमक असतें; तें कमी कृत्रिम म्हणून अनेकदा अधिक परिणामकारक होतें. अनुप्रास हा पोरकट असूं शकतो, तसा प्रौढ कवितेला खुलविण्याइतका परिणामकारकहि असतो. अशी व्यंजनांची आणि स्वरांची पुनरावृत्ति, कधीकधी शब्दांचीहि, करून अनिलांनी आपल्या कवितांत अनेकविध सौंदर्यें आणलीं आहेत. भाषेंतील असल्या सामर्थ्याचा खरी कविता नेहमी शोध घेत असते. काव्यांतील नवता हीच.

अनिलांची कविता नेहमीच सौंदर्याचा शोध घेत आली. सौंदर्याचा अर्थ मात्र फार व्यापक घ्यायचा. प्रेमाच्या ऐन भरांतील ' फुलवातीं 'तहि शरीरसौंदर्याचें चोज केलेलें नाही. (अमूर्त आणि अनिश्चित प्रियेबाबत तें अधिक होतें का?) तेथे प्रेमाच्या छटा फुलांत आणि निसर्गातील अन्य लावण्यांत प्रतिबिंबित झाल्या आहेत. निसर्गाचें वेड तेवढ्यापुरतें नव्हतें; ती फुलभाषा केवळ संकेताची नव्हती. या वृत्तीचा विकास झाला; आणि

वर्णनांत अधिकाधिक बारकावा आला. हा तपशील वर्षानुवर्षांच्या व्यासंगांतून कमावलेला. झाडें, फुलें, पक्षी यांची बारीकसारीक माहिती नादिष्टपणें आत्मसात् केलेली. तसेंच रंगज्ञानहि. तरुणपणीं कवीने थोडीशी चित्रकलेची हौस केली होती. म्हणून असेल कदाचित्, रंगाची उगाच उधळपट्टी नाही की चमत्कारिक रंग-विशेषणें नाहीत. 'मेघांची भूमि'सारख्या एखाद्या कवितेंत ढगांचे रंग आणि आकार यांच्या सूक्ष्म तपशिलांची लयलूट आहे—पण तोच कवितेचा विषय आहे. शेवटच्या दशपद्यांपैकी बहुतेकांत निसर्गाचें नितळ चित्रण आहे; पण तें नुसतें वर्णन नाही, निसर्ग आणि कवि एकमेकाशीं तदात्म झाले आहेत. एक दुसऱ्याची भाषा होतो.

अशीं आणखी किती तरी सौंदर्यें आहेत. जीवनांत दंग असलेल्या या कवीला सगळ्याच अनुभवांतील—भावना, विचार आणि विकार यांतील, यशाप्रमाणे अपयशांतीलहि, आनंदाप्रमाणे उदासपणांतीलहि—उत्कटता खोलवर भिडते. भविष्याची ओढ आहे आणि भूतकाळाबद्दल दुबळी खंत नाही. त्याच अनुभवाभोवती गिरक्या घेत राहण्याचा धर्म नाही. 'जिवाला लागते तहान जेव्हा', तेव्हा तिचा निरास होतो तो संसारांतील विसाव्याच्या आणि निसर्गांतील सुंदरतेच्या सुवासांनी. हा कवि संसाराच्या 'कोवळ्या गुंतागुंतींत' मग्न आहे; त्याच्या एकाएका परागाशीं आणि केसराशीं एकरूप झाला आहे. तो त्याच्या ओलाव्याने 'थिजून...ओलाचिंब' होतो, पण त्या कोषांतच पूर्णपणें फसलेला नाही. त्यापलीकडचें तेंहि जवळचें, आंतील, व्हावें इतकें त्याच्या भावबंधाचें सूत्र विस्तारतें. प्रीति निराळेपणांतून 'जगांतल्या सुखदुःखीं मिळालेपणा'पर्यंत फुलून येते. रामटेक येथील त्रिविक्रम वामनाची भंगलेली मूर्ति आणि मंदिर, त्यांतून उभी राहणारी संस्कृतिऱ्हासाची कथा, चीनमधील रणकंदनांतून निसटलेला अनाथ पोरगा, नफेबाजांचे अनाचार, गरिबांचे भयाण संसार आणि असल्या भ्रष्टतेने 'अधःस्तर' झालेलें आपलें जीवन यांनी या प्रीतिवंताचा प्रक्षोभ होतो. ज्याला जिवाभावाने प्रेम करतां येतें तोच त्वेषाने उसळून

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38626 वि: काव्य
क्रमांक 2484 नों: दि: 22|11|69

येतो ; सगळे व्यवहार सावधपणें सांभाळणाराला बेसटपणाचेंच कौतुक वाटणार, आणि परपीडेने होरपळणें हें सोंग वाटणार. बाहेरच्या जगाशीं मी संपर्क ठेवणार नाही, दारेंखिडक्या बंद करून आणि पाय पोटाशीं घेऊन माझ्या 'खाजगी' भावना मी उबवीत बसणार—एवढाच काव्यांतील आत्मनिष्ठेचा अर्थ नव्हे हें कोणीहि कबूल करील ; पण कवीने फक्त तेंच करावें ही हल्ली अनेकांची 'खासगी' भावना असावी—आणि तिचा जाहीर उच्चारहि एकसारखा होत असतो. आम्हीं मंजूर केलेलीं लक्षणें ज्याला लागू पडतात तोच खरा कवि या दुराग्रहाचा आज बडिवार आहे. वस्तुतः कवीने निश्चित काय करावें, कशाविषयी लिहावें आणि लिहूं नये, हें सांगण्याच्या भानगडींत कोणीं पडूं नये. जगाचें सोयरसुतक न मानणारा चांगली कविता लिहील, तसा तें मानणारा आणि तें मानावें ही निष्ठा बाळगणाराहि चांगली कविता लिहील. फक्त तो चांगला कवि असला पाहिजे. आजच्या जगांत निष्ठा कोलमडत आहेत असें मानलें तरी कोलमडलेल्या निष्ठेवरच कविता लिहावी, खंबीर निष्ठेवर लिहिल्यास कृत्रिम होईल, असें कां मानावें ? मौज अशी की ज्यांना काल निष्ठा होत्या अशा कांहींना कवि म्हणून आज त्याविषयी अवघडल्यासारखें वाटत असावें. जुनीं शिंगें मोडून नव्या कळपांत मिरविणें हें फायद्याचें कलम असेल कदाचित् ! अनिलांची कविता इतकीं वर्षें नवनवीन दिशा शोधीत आहे ; त्यांतील कांही दिशांबद्दल मतभेद झाला तरी त्या शोधामागील ऊर्मींबद्दल आणि प्रेरणांबद्दल रसिकाला आदर वाटला पाहिजे—मग ते अमुक एका कळपांत बसोत न बसोत. या कवीचें जीवन समृद्ध आहे—अनुभवांनी, भावभावनांनी आणि विचारांनी. अनेक कलांचें मर्म त्यांनी समरसतेने आस्वादिलें आहे. या सर्वांचा मेळ आहे. नुसती विविधता नाही. आणि या विलक्षण समृद्धतेशीं, जीवनावरील या अपार आसक्तीशीं, त्यांच्या कवितेने आजवर इमान राखलें आहे.

मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११८८४

# सांगाती

हातीं हात धरून माझा
चालवणारा कोण तूं ?
जेथे जातों तेथे माझा
काय म्हणून सांगाती ?
आवडतोस तूं मला
की नावडतोस ?
माझें मला कळत नाही !
येवढें मात्र जाणवतें की
माझा हात धरून असें चालवलेलें
मला मुळीच खपत नाही !
स्वच्छंदाला माझ्या त्याचा करकोचा पडतो ना !
झिडकारून तुझा हात
म्हणून दूर पळत जातों
बागडतों, अडखळतों, धडपडतों
केवळ तूं कनवाळू पाठीशीं उभा म्हणून
माझें दुःख जाणवून
उगाच किंचाळत सुटतों
एरव्ही तूं नसतांना
पडलों अन् लागलें तर
पुन्हा उठून हुंदडतों !

खांद्यावर हात माझ्या सदोदित
असा ठेवूं नकोस ना
अशानेच माझी वाढ खुंटत जाते

असें मला वाटतें ना !
बरोबरीचें वागणें हें खरोखरीचें आहे का ?
खूप खूप माझी उंची एकाकीच
माझी मलाच वाढवूं दे
तुझ्याहून नसली तरी तुझ्यासमान होऊं दे
तोवर असें दूरदुरून, तुझा हात दूर करून
मान उंच उभारून
तुझ्याकडे धिटकारून पाहूं दे !

## आज अंधारी रात

आज अंधारी रात आहे
चंदेरी दरिया नसे
तारांची बरसात आहे
विश्व सारें स्तब्ध आहे
कसल्या तरी धुंदींतला
ओठांवरी शब्दार्थ आहे
दूरचाहि दीप नाही
सारीकडे काळोख आहे
अंतरंगीं त्यांतहि पण
ओळखीचा प्रकाश आहे
आज अंधारी रात आहे !

# स्वातंत्र्यचक्रप्रवर्तन

आमच्या स्वातंत्र्यचक्राची ध्वजा वरती चढे
दास होऊं ना कधीही ना कधी आता पुढे
राज्य चालव एकछत्री तूं ध्वजा, आम्हांवरी
आमच्या शरिरावरी, बुद्धीवरी, हृदयावरी
भूवरी ह्या आमच्या, ह्या सागरावर राहुं दे
सत्ता तुझी आकाशिंही, वायूवरीही गाजुं दे
एकचक्री चक्रवर्ती तूंच आता भारतीं
सूर्योदयीं सूर्यास्तवेळीं घ्यावयाला आरती
वीर आम्ही सज्ज आहों रक्षिण्या सारें तुझें
आमचें सर्वस्व तूं, तूं आमचा, आम्ही तुझे
आम्ही तुझे
आम्ही तुझे
आम्ही तुझे !

## रुसवा

अजुनी रुसून आहे खुलतां कळी खुले ना
मिटले तसेच ओठ की पाकळीं हले ना !

समजूत मीं करावी म्हणुनीच तूं रुसावें
मीं हास सांगतांच रडतांहि तूं हसावें
तें आज कां नसावें, समजावणी पटेना
धरिला असा अबोला की बोल बोलवे ना

कां भावली मिठाची अश्रूंत होत आहे
विरणार सागरीं ह्या जाणून दूर राहे ?
चाले अटीतटीने सुटतां अढी सुटेना
मिटवील अंतराला ऐसी मिठी जुटे ना !

की गूढ कांहि डाव, वरचा न हा तरंग
घेण्यास खोल ठाव, बघण्यास अंतरंग ?
रुसवा असा कसा हा ज्या आपलें कळेना
अजुनी रुसून आहे खुलतां कळी खुलेना !

## ओळख

हलुहलु हळू किती
वितळतो हा काळोख
पुसट पुसट पटे
थोडी थोडीसी ओळख

किती वेळ वेळ जाई
जुळवितां ह्या साखळ्या
तुटक तुटक दुवे
हातीं वेगळ्या वेगळ्या

जवळ जवळ किती
आणि दूर दूर दूर
तिळतिळ तिळ तुटे
तळमळत अंतर

अंधुक अंधुक दिसे
बिंदु बिंदु प्रकाशाचा
चुकत चुकत मिळे
माग मागचा पुढचा

नाही-नाहीतून आहे
आहे-आहेतून नाही
कळत कळत कळे
अनाकलनीय कांही

## अर्घ्य

उगवत तो सूर्य आज अर्घ्य दिलें ज्यालागुनि
तेजाळत नव क्षितिजें नवजीवन सळसळुनी

गेला तम पार विरुनि
निद्राही जात उडुनि
जागृत जनिं जागृत मनिं
ही प्रकाशपर्वणी

मायभूमि मम स्वतंत्र
स्वातंत्र्यच सर्व जनीं
'मी स्वतंत्र' घोषमंत्र
घुमत सदा कानीं

हृदयांतरिं आकांक्षा
भारतीय भारतमनिं
ऊर्मि उमेदी आशा
येती किति उसळोनी

नवशक्ती, राष्ट्र नवें
आज इथे हें जन्मुनि
मानवता आणि जगत
उजळो नव स्फूर्तींनी

उगवत तो सूर्य आज अर्घ्य दिलें ज्यालागुनि
तेजाळत नव क्षितिजें नवजीवन सळसळुनी ! !

## गाठ

आज अचानक गाठ पडे
भलत्या वेळीं भलत्या मेळीं
असतां मन भलतीचकडे
आज अचानक गाठ पडे

नयन वळवितां सहज कुठे तरी
एकाएकी तूंच पुढे
आज अचानक गाठ पडे

दचकुनि जागत जीव निजेंतच
क्षणभर अंतरपट उघडे
आज अचानक गाठ पडे

नसतां मनिंमानसीं अशी ही
अवचित दृष्टिस दृष्टि भिडे
आज अचानक गाठ पडे

गूढ खूण तव कळुन नाकळुन
भांबावुन मागे मुरडे
आज अचानक गाठ पडे

निसटुनि जाई संधीचा क्षण
सदा असा संकोच नडे
आज अचानक गाठ पडे!

## १९४७

वर्तमानपत्रें
वाचवतहि नाहीत आता
खिन्नपणानें तीं हातांत घेतों
टाकून देतों तशींच खाली
पाहून वरचे जाड मथळे,
काळे काळे खिळे,
घण पोलादी
ठोकीत जातात माझ्या मस्तकांत !

जिकडेतिकडे भेसूर वार्ता
पाशवी वृत्तींचें नग्न दर्शन
युद्धालाहि घृणा आणतील अशीं
क्रूर कृष्णकृत्यें !
नीचपणाची नीचतर सीमा
अत्याचाराची, बलात्काराची
निष्कारण वध, राक्षसी कत्तली
जाळपोळ, लूट घरादाराची

आणि हें सारें
शांतीच्या धर्माचा करीत वरती
जयजयकार
देत आरोळ्या ' देवच महान् '

आणि त्या अत्याचारांचे बळी
शिदोडहि वर उसळून यावा

इतकी साहत मानखंडना
शिसारी येईल असें जीवन
मरतां मरतां कवटाळीत
लाचारीला लाज आणील अशी
त्यांची लाचारी !

गूढ गूढ गोड, उच्च उच्च रम्य
ललित लालित विरल तरल
उदास कोमल
नव बंगालच्या नवसंस्कृतीच्या
पूकराखाली
जमलेला हा बंगाळ गाळ
नौखालींतला
उपसला आणि फासला जात असतां तोंडा
तिकडे उडत पंजाबच्याहि
धिप्पाड उंच रुंद देहावर
जालीम तेजाब,
मिशाळ केसाळ भव्य चेहऱ्याचा
उतरवीत रुआब खाली
तिथेहि तेंच!!

आदळत आली आता त्यावरी
घोर घोषणा
कानांत ओतीत तापलें तेल
अखंड आमच्या मायभूमीचीं
करून खांडकीं तीन तिहीकडे
स्वातंत्र्य म्हणे मिळणार आम्हां !

अनुक्रम 38720 वि: काव्य
क्रमांक 2484 नों: दि: 29/7/18

घेतलें आहे का गुंगीचें औषध
आम्हीं सर्वांनी की आम्हीच तिचे
प्राण असतां
आम्हीच तिचा देह असतां
वेदनांनी आम्हीं व्याकुळ न व्हावें?
तिच्या शरिराचे तुकडे होतां!

अरे! आमच्या कालच्या भावा
असून आमच्या हाडामांसाचाच
वेष बदलून, केस वाढवून
दाढीमिश्यांचे,
कैफ चढवून कुठला तरी
बहकून दुष्ट भडकावणीने
झालास आमचा इतका वैरी
की वाटणीचा मांडून दावा
आईचे मागसी तुकडे करून!

आमचाच तूं
कधी ना तरी येशील आपल्या ठिकाणावरी
धरूनी अशी बावळी आशा
आम्ही तुझे हट्ट पुरवीत गेलों
लाडवीत तुला
सहन करीत तुझे वेडेचार
किती तुझ्यासाठी खस्ता खाऊन
स्वार्थत्याग केले
त्याचें असें हें देतोस फळ
सत्तालोलुपांच्या कारवायांना

पडून बळी ?
वाटतें तुला की आम्ही कधीहि
उतरवूं नच शकूं त्यांची धुंदी ?
विशाल मानवी नवसंस्कृतींत
तुला समावून घेऊं न शकूं ?
परत ओढून तुला आणाया
होणाऱ्या क्रांतींत बळच नसे ?

अघोर घटना घोर वर्षाच्या ह्या !
स्वराज्य मिळालें म्हणतां काय ?
जिंकिलें म्हणतां स्वातंत्र्ययुद्ध ?
सुवर्ण अक्षरीं लिहून ठेवावें
काय हें वर्ष ?
नाही, नाही, तें तापल्या सळ्या घेऊन हातीं
जळत्या अक्षरीं छातीवरती
वाटे डागावें !
५७ चें एक अपेश
दुसरें वर हें ४७ चें
तयारींत राहा
स्वातंत्र्याचें युद्ध
पुढेच आहे !!

# पर्यंत

सोबत आहें तुमच्या मीही
कांहि दूरपर्यंत
गडे हो कांहि दूरपर्यंत,
परंतु पुढती नाही म्हणुनी
नसो खेद् वा खंत !

आहे सोबत तोवर आहे
तुमचें सर्व पसंत
गडे हो तुमचें सर्व पसंत
तुमचीं माझीं कामें करितां
नच घेईन उसंत !

निश्चित पुढची वाट असे ही
निश्चित आणिक अंत
मधेच पण मी निघून जाइन
शोधायास दिगंत !

कुणी नका येऊं मजमागे
तिकडे नच पदपंथ
गडे हो तिकडे नच पदपंथ
केवळ आहे अंतर तिकडे
नुसतें भ्रांत अनंत !

कुठे जायचें तेंहि कळेना
दूरदूरपर्यंत !

# आम्ही

करणार जें आम्ही होतों
आणि केलें नाही
मिळवणार जें आम्ही होतों
आणि मिळविलें नाही
वाटलें जे आम्ही आहों
तेहि आम्ही नाही
आणि वर जें बोलतों
तो बोल आमचा नाही
घडवूं म्हणतों एक
घडतें भलतें कांही
विश्वास मागूं पाहतों
आमचा अम्हां विश्वास नाही !

अरे, जें जें विसरलों आम्ही
जेथे जेथे घसरलों
लालचावून फितुर झालों
बेमान झालों, बेभान झालों
मस्तावलों, सुस्तावलों
जें केलें, केलें नाही
त्या सर्वांचा पश्चात्ताप
आम्हां होऊन न होऊन काय !
आमची आत्मवंचना
आहे इतकी जबर की

आश्चर्य नाही मानलें जर
आम्ही अम्हांला संत कोणी !

आम्ही आहों जाणून
हे लोक भोळे
विसरतात आमचे चाळे
आम्हांवर विश्वासून
आम्हांवाचून आहे कोण
त्यांना तरी ! !

विसरतील हे लोक
विसरेल वर्तमान—आहे खरें !
पण इतिहास—
इतिहास विसरणार नाही
क्षमा करणार नाही—हेंहि असेल खरें !
घडतील जे परिणाम
—चुकवूं आम्ही—
भोगेल ते पुढची पिढी !
उलटेल जर आम्हांवरी
गर्जून उठेल,
"तुम्हीं जें केलें नाही
तें करणार आहों
घडविलें जें तुम्हीं नाही
तें घडविणार आहों"
तेव्हा आम्ही नसूं—
आणि असलों तरी
म्हणूं आम्ही

आमच्या वंचनेनेच
घडविली ही क्रांति
श्रेय त्याचेंहि घेऊं
आम्ही ! !

## तहान

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों अनंत ताऱ्यांनी थरारलेली तरल हवा
सुखदुःखांचे ऊन थंड श्वास
आशानिराशांच्या अंतरंगांतील अदम्य विश्वास
मिसळून आर्द्र झालेली हवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों आकाश-धरेच्या भास्वररंगांचा स्निग्ध ओलावा
अवसेच्या काळ्या डोळ्यांतील पाणी
पुनवेच्या अंगीं रजतरंगाचे हिमसेक, आणि
विनाकिनाऱ्याच्या सागरावरचे निळे तुषार
गवतावरल्या लसलसत्या हिरव्यागार
रंगामधल्या दवबिंदूंचा स्निग्ध ओलावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों जिवलगांच्या सहवासांतील तृप्त विसावा
स्तन्य ओसंडितां बाळाच्या ओठीं
जड पापण्यांत झाकळतां दिठी
प्रियाप्रियकरमीलनाची सैल पडतां मिठी
आकंठपूर्तीचा दिसे जो विश्रब्ध तृप्त विसावा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों वासांत भिजल्या आठवणींचा ओला गारवा
मातीच्या उन्मत्त गंधांत न्हालेली प्रथम भेट

सागाच्या फुलांत चिंब झालेली खिन्न तातातूट
प्राजक्तांच्या हारीं झिमझिम सरी पुनर्मीलन
मोगऱ्याचा वास चिरसहवास
दुरावतां आणि दूरदुरून
पिकल्या धानाच्या सूक्ष्म सुवासाच्या आठवणींचा ओला गारवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों स्मृतींच्या तंद्रींत मंद्र संगीताचा धुंद गोडवा
वेळुवनांतील नाजुक शीळ, पतझडीची आर्त सळसळ
सागराचें घनगंभीर गर्जित, अस्ताईचे मंद खर्जातील सूर
सनईसारख्या कोवळ्या गळ्याची तीव्र हुरहूर
कपालकाशांत शांत घंटानाद
निर्याणगीताच्या शिंगाची साद
महाप्रस्थानाच्या प्रलयलयीच्या मंद्र संगीताचा धुंद गोडवा

## प्रणाम

तुज स्वतंत्रते प्रणाम !

सळसळत्या रक्तांतुन भावना उचंबळून
आकांक्षा उसळति ज्या त्यांचे घेई प्रणाम !
तुज स्वतंत्रते प्रणाम !

हात मुक्त जरि झाले लोहशृंखला तुटून
राहिल्या कड्या तशाच मनगटांस आवळून
खळखळती त्या अजून, खणखणून जाणवून
तोडित असतां त्यांना घाव घणांचे पडून
घणघण जणु घंटारव होत त्यांत घे प्रणाम !
तुज स्वतंत्रते प्रणाम !

सागाच्या फुलांत चिंब झालेली खिन्न तातातूट
प्राजक्तांच्या हारीं झिमझिम सरी पुनर्मीलन
मोगऱ्याचा वास चिरसहवास
दुरावतां आणि दूरदुरून
पिकल्या धानाच्या सूक्ष्म सुवासाच्या आठवणींचा ओला गारवा

जिवाला लागते तहान जेव्हा
पिऊन घेतों स्मृतींच्या तंद्रींत मंद्र संगीताचा धुंद गोडवा
वेळुवनांतील नाजुक शीळ, पतझडीची आर्त सळसळ
सागराचें घनगंभीर गर्जित, अस्ताईचे मंद खर्जातील सूर
सनईसारख्या कोवळ्या गळ्याची तीव्र हुरहूर
कपालकाशांत शांत घंटानाद
निर्याणगीताच्या शिंगाची साद
महाप्रस्थानाच्या प्रलयलयीच्या मंद्र संगीताचा धुंद गोडवा

# प्रणाम

तुज स्वतंत्रते प्रणाम !

सळसळत्या रक्तांतुन भावना उचंबळून
आकांक्षा उसळति ज्या त्यांचे घेई प्रणाम !
तुज स्वतंत्रते प्रणाम !

हात मुक्त जरि झाले लोहशृंखला तुटून
राहिल्या कड्या तशाच मनगटांस आवळून
खळखळती त्या अजून, खणखणून जाणवून
तोडित असतां त्यांना घाव घणांचे पडून
घणघण जणु घंटारव होत त्यांत घे प्रणाम !
तुज स्वतंत्रते प्रणाम !

## जाग

जाग येतो जेव्हा
अति थकव्याच्या गाढ निद्रेतून
परत फिरत असतो तेव्हा
दूर गेलेला जीव सावकाश
चोरपावलीं
शिरत असतो भीत भीत आंत
आपल्या घरांत !

उघडती आणि मिटती पुन्हा
जड पापण्या
स्तिमित होऊनी पाहती डोळे
आसमंतांत
क्षणभर तरी
कुठे आणखी कोण न कळे !

हळूहळू मग
संवेदना येऊं लागे एक एक—
आकाशाचा शब्दगुण आकळे
स्पर्श गार गार वाऱ्यांचा कळे
दिसती निळ्यांत रंग पिवळे
स्थूलाकारांतून आकृति निवळे
शुष्क जिव्हेवर स्वाद रसाळे
गंधवती पृथ्वी वास दरवळे
अस्फुटांतून होत व्यक्त, स्पष्ट

विश्व प्रकट
शब्द-स्पर्श-रूप-रस-गंधाची
प्रचीति सृष्टीची
जाणीव होई नंतर अंतरीं मज 'मी'पणाची
विश्रांत देहांत परतलेल्या श्रांत जिवाची !

विश्रांत देहांत जीव हा श्रांत
परत जो आला
कुठे होता गेला
सोडून भ्रांत ?
धुंदीत अनंत ?
कुणा जिवाच्या जिवलगासाठी
ग्रहगोलांतून तारकापुंजांत
आकाशगंगेच्या तेजजलाचा पूर ओलांडित
हिंडत होता घ्यावया गाठी ?
अवकाशामध्ये विरून गेलेल्या
आशाआकांक्षा शोधीत शोधीत
मागे फिरला
अधिक होऊन खिन्न, म्लान, दीन !

परत आलेला जीव हा असा
थकूनभागून
घालवाया शीण
आपण राही स्वस्थ निजून
देह जागवून
व्यवहाराचीं चक्रें दैनंदिन
सुरू करून

यंत्रासम त्यांना गिरगिरणें
फिरत राहणें निर्जीवपणें
आहे आता भाग
जेव्हा येतो जाग !

# सारेच दीप कसे मंदावले आता

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझूं विझूं झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असें कुठेच तेज नाही !
थिजले कसे आवाज सारे ?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही ?
या रे या ! द्या जीव ह्या वाणीवर
अशी वाणी निघत नाही
भावनांना चेव नाही
यौवना आव्हान नाही
संघर्ष नाही झुंज नाही
जावें ज्यामागे बेधडक
असा झुंजार वीर नाही
कामीं यावा देह जिथे
असा रणसंग्राम नाही !
प्रेतेंही उठतील अशा
मंत्राचा उद्घोष नाही !
आशांचा हिरमोड
आणि बंडांचा बीमोड
सारीकडे तडजोड
होऊन, सारे कसे सर्दावले आता ?
सारेच कसे थंडावले आता !

साऱ्याच आघाड्यावरी ही अशी हो सामसूम !
वरतीखाली सामसूम
इकडेतिकडे सामसूम
आजूबाजूस सामसूम
जनमनांतहि सामसूम
हृदयांमधेहि सामसूम
कुठे पोटतिडिक नाही
प्रेमामधेही धडक नाही
जीव ओढून घेईल अशी
डोळ्यामध्ये फडक नाही
जीवनाला वाव नाही
तारुण्याची चमक नाही, धमक नाही
साहित्यांत चैतन्य नाही
संगीतांत इंगित आणि कलेमध्ये उकल नाही
सरळपणाला भाव नाही
साधा सदाचार नाही
जो तो कसा लाचार आहे
ह्याची त्याला फूस आहे
घराघरांत घूस आहे !
तेरी चुप मेरी चुप
गुपचुप
सारा हिशेबी व्यवहार आहे !
जो तो जागा धरून आहे
नाही तर अडवून आहे
दबेल असून चढेल आहे
योजनांची चळत आहे
परकियांची मदत आहे

तज्ञांचीहि उणीव नाही
आपली जाणीव नाही !

त्याग त्यागिले भोग मागे
दाता दीनयाचना मागे
शील आपलें मोल मागे
सौंदर्याची विक्री चाले
कागदांच्या कपट्यांवर !
सारीं स्वरूपें कुरूप झालीं
हुरूप कशाचा नाही चित्ता !
सारेच दीप कसे मंदावले आता ! !

## अभिसार

स्वप्नांत तरी निःसंशय
भेट तुझी
होणारच होती
तूं न कधीहि दिधलें
वचन मोडलें
तूं अपुल्या शब्दावर
स्थिर
आणिक धैर्य तुला निष्ठेचें
ओढ तुला अंतरिंची
प्रीतीची
तूं येशिल कापित हें महदंतर
तूं न मानशील अशी रात्र काजळी
जुमानशील वादळीं हवा, बिजली
पाउस वा मुसळधार
उल्लंघुन आडरान
पार करुन पूर नदीनाल्यांचे
येशीलच तूं
अंतरबहिरंग भिजत
येशीलच तूं
कडकडून भेटाया
हतभागी मी पण ! मज
नीज न येते
नच स्वप्नहि दिसतें ! !

## आंत

मनींचें मनिंच राहिलें आंत

बोलत बोलत उगिच कांहितरि जरी उलटली रात
पलटली आता होत प्रभात
मनींचें मनिंच राहिलें आंत

चुकवित दृष्टिस दृष्टि राहिली ओळख काळोखांत
मिसळुनि जात अता सकळांत
मनींचें मनिंच राहिलें आंत

ओठांवरुनी आशय फिरला परत पुन्हा हृदयांत
घुटमळे जो आता शब्दांत
मनींचें मनिंच राहिलें आंत

भुलवित निजपण तरिहि दुजेपण उरवित एकांतांत
विसर ज्याचा पडतो जगतांत
मनींचें मनिंच राहिलें आंत !

# मेघांची भूमि

मेघांची भूमि—
निळ्या अंतराळीं तरंगणारी विविध रंगांची ही चित्रभूमि !
खेळ खेळतात जेथे रविकर
सप्त रंगांच्या रंगपटावर
किमया करीत कोवळ्या छटांची
क्षणाक्षणाला बदलणाऱ्या, अपूर्व नवता प्रसवणाऱ्या रंगसंगतीची
भडक केशरी पटाच्या खाली
फिकट हिरव्या अस्तरावरली
लिंबकांतीची झालर पिवळी
आणखी वरती केशरावर
कुठे कुठे शोभे शेंदरी किनार
कुंकवी गोड्यांची झुपकेदार
मिसळत मग निळ्यांत जात सारी रंगत
इथे जास्वंदी, तिथे जांभळा, तिकडे गुलाबी, राखी रंग होत
मध्येच मोतिया झुळुक इथे
मोतीशिंपल्याच्या रजतगर्भाची लोल्कासमान भुलावणी तिथे
शेवटी गडद निळ्याकाळ्याचे गोल कल्लोळ
ज्यावर तापल्या चंदेरी सोनेरी रसाची ढाळ
विनारंगाच्या स्वतःप्रकाशाच्या अंतरंगाच्या अनंत ऊर्मि
प्रकटविणारी ही लीलाभूमि !
मेघांची भूमि !

मेघांची भूमि—
अनेक अथांग महासागरांत विखरलेली ही द्वीपांची भूमि !

भव्य आकाराच्या खंडांचे फुगीर, फुटीर, दंतुर, दीर्घ किनारे
समुद्रांत दूरवर घुसलेलीं, वाकडींतिकडीं लांब भूशिरें
निळ्या नागिणींच्यासारख्या नद्या वळसे घेत
जाउनी मिळती त्रिकोणमुखांनी सागरा जेथ
द्वीपकल्पांना जोडीत जाणाऱ्या निरुंद संयोगभूमीमधूनी
आखातांतुनी उपसागरांत वाहून नेणाऱ्या अतिआकुंचित सामुद्रधुनी
भूमीने वेढलीं शांत सरोवरें, निर्भर भूमध्यसमुद्र आंत
सुदूरपर्यंत मूळमध्यवर्ती भूभागापासून आसमंतांत
पसरलेलीं लहानमोठ्या ठिपक्यासमान बेटें सहस्र
प्रवाळद्वीपांचें मरकतरंगी कंकण येथे
सरकत दूर तुटून गेलेल्या भूमिखंडाचें महाद्वीप तेथे
तरल, पांढऱ्या अभ्रखंडाचें डोल्काठीला शीड लावूनी
चंद्रकोरीची नौका जातसे त्या द्वीपापर्यंत ह्या द्वीपाहूनी
निरनिराळ्या आकृतींमध्ये सपाट जलांत निम्नोन्नत भूमि
पृथ्वीच्या गोलांत रचूं पाहणाऱ्या विश्वकर्म्याची ही प्रयोगभूमि
मेघांची भूमि!

मेघांची भूमि—
क्षितिजावरली क्रीडाशैलांची अधांतरींची निरालंब ही पर्वतभूमि!
पायथ्याकडच्या दऱ्याखोऱ्यांच्या खुज्या डोंगरांची रांगच रांग
ज्यावर धरेच्या वनस्पतींचा परावर्तित हिरवा रंग
सागरनील रंगाच्या धुक्याचे लोट वर जातां नीलरक्त होत
शृंगांच्या काळ्या बाह्यरेषेपाशी रक्तकांचनाचे झोतच झोत
मध्येच एखाद्या शिखरांतून ज्वालामुखीसम अग्निलोळ उठे
खदिरांगाराच्या पाषाणरसाच्या उकळत्या नद्या वाहून आरक्त तडाग साठे
पार्श्वभूमीसम पर्वतराजी उत्तुंग, गौरांग हिमशिखरांची
हस्तिदंतावर कोरीव नक्षीची, ताशीव ब्रिल्वरी शुभ्र स्फटिकाची

रजतरंगाचा कैलास इथे, तिकडे धवलगिरी आणखी कांचनगंगा
हिमनद्यांचे प्रपात संथ, वितळत आणि पूराने भरत पृथ्वीच्या गंगा
देवदेवतांची, हरगौरीच्या अट्टाहासाची, स्वर्गमाथ्याची ही विहारभूमि!
मेघांची भूमि!

मेघांची भूमि—
मायावी भासांची इंद्रजालाच्या चमत्कृतींची ही यक्षभूमि!
चंद्रज्योतीच्या भुईनळ्याच्या रजतभास्वर धूम्रमंडळांत
प्रकट होतात शालभंजिका रंगशिळेवर भरतनाट्याचीं आवर्तनें घेत
गंधर्व-अप्सरा, किन्नर-किन्नरी, सिद्ध-विद्याधर, यक्ष-यक्षिणी
पिच्छमेघांचे पिसारे लावून उड्डाण करीत जातात हातांत वाद्यें घेऊनी
स्वर्णकळसांची गंधर्वनगरी मणिकुट्टिमाची अलका इथे
चिरविरहिणी यक्षप्रियेसाठी मेघदूत नेत संदेश जिथे
कलावंतांच्या प्रतिभास्फूर्तीची सृजनशक्तीची प्रत्यक्षांतली ही स्वप्नभूमि
मेघांची भूमि!!

## ओढ

ओढ तुझी लपवुन ठेविन मी !

मी न कधी वातायनिं बसुनी
वाट तुझी पाहिन न्याहाळित
सांजवात उजळुन अंधारीं
उगिच स्नेह नच राहिन जाळित
ओळखिची जर पारख असली
तरच तुझ्या सन्निध येइन मी
ओढ तुझी लपवुन ठेविन मी

मी नच दृष्टी तुजला पाहुन
कावरिबावरि होऊं देइन
धडधड हृदयाची थांबवुनी
घेइन मी मजला सांभाळुन
अंतरिंचा मधुभाव कधीहि न
तुजला सुचविन कळुं देइन मी
ओढ तुझी लपवुन ठेविन मी

मजला जरि कळतें माझें मन
तुझें न अजुनी जाणवतें पण
तुझें वेगळेपण मजसाठि न
तोवरि मीहि जन साधारण
प्रकाश जोवरि निश्चित न दिसे
अंधारच पाहत राहिन मी
ओढ तुझी लपवुन ठेविन मी ! !

# अंत

उदात्त अंत—ऐश्वर्यवंत
अनंत विश्वांत घुमवीत ऊर्ध्व शोकसंगीत
उच्छिन्न जीवन भोवताली तरी त्यांत गीतस्वन
आणि आमच्या अश्रूंतहि आहे तेज भरून

शीळ वाजवीत गेला तो निघून
किशोर होता तो यौवनीं नूतन
सरळ ताठर उंच देहयष्टि
अचूक स्थिर तेजाळ दृष्टि

अविचल धीर धीट आणि शांत
होता तो अंताच्या क्षणापर्यंत
अगणित संकटांच्या व्यूहांत
जीवनमृत्यूच्या नित्य द्वंद्वांत

त्याने सर्वस्वाची सेवा आपली
सर्वोच्च कर्तव्यासाठी अर्पिली
अंगिकारला शाश्वत मार्ग
शूरांचा मार्ग, वीरांचा मार्ग !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 38620 वि: काव्य
क्रमांक 2584 नों दि 2/11/69

# झोप

झोप माझी उडुन जाते

लागलेल्या भर निजेंतुन
दचकुनी मन जाग घेतें
झोप माझी उडुन जाते

रेशमी धाग्यांत गाठलि
स्वप्नसाखळि गळुन पडते
झोप माझी उडुन जाते

बोचतें जीवास कांही
हृदय मग व्याकूळ होतें
झोप माझी उडुन जाते

व्यापिती चित्तास चिंता
ऊर भारावून झुरतें
झोप माझी उडुन जाते

आठवणि येऊन जळत्या
तटतटा काळीज तुटतें
झोप माझी उडुन जाते !

# स्वप्नें

स्वप्नें हीं
स्वप्नांचें एक निराळेंच विश्व
अमर्याद, अति विस्तृत
वेगळेच तेथिल दिक्काल आणि
वेगळींच परिमाणें
अनिर्दिष्ट दिशा तिथे
स्वेच्छ अनिर्बंध भ्रमण
दूर निकट उंच खोल संज्ञांना भिन्न अर्थ
तसूंतसूंतच राहे योजनभर महदंतर
घटिकेच्या आंत प्रहर, दिनक्रिया
क्षणाआंत कितिक तास
सोन्याच्या धूलिकणांनी भरल्या
पीत प्रकाशामधले दिवस तिथे
गर्द जांभळ्या रात्री
चंद्रचांदणें हिरवें
धुक्यावरिल चित्रासम
स्वप्नजगत् !

## हुरूप

कुठून येतो हा हुरूप मला ?
खाली घातलेली मान वर होते
हारलेले हात पुन्हा लागतात मुठी आवळूं
खचली कंबर पुन्हा ताठ होते
पेलण्यास ओझें
पावलें थकलीं चढूं पाहतात
अडल्या वाटा
कुठून येतो हा हुरूप मला !

शिणलेला आणि वैतागला मी
गोळा करतांना वाळलीं पानें
मातीमध्ये हात मळवीत होतों
आहे का ह्या सुप्त मातीमध्येच
असें सामर्थ्य
स्पर्शानेच जागणारें चैतन्य ?

# क्षणभर

थकले आहेत पाय जरा
चालत आहेत तरी अजून
बसावेंसें वाटत नाही
विश्रांतिस्थळ दिसत नाही
अशी कुरकुर नाही मनांत
ओझें नाही पाठीवर कसलेंहि
सहज चढून जाऊं शकतों
जीवनाचा सह्याद्री
पाय डगडगत नाहीत अजून उतरतांना
अधूनमधून येते पण आताशा
छातीमध्ये एक चमक
उसवूं पाहते जखम कधी घावाची
भोवळ येत नाही तरी
डोळे मिटूं लागतात
आणि नकळत दोन्ही हात
हृदय घट्ट आवळतात
तेव्हा वाटतें, थांबावें थोडें
खोल खोल श्वास घ्यावे
इकडेतिकडे पाहत राहावें
क्षणभर !

# अर्थ

कुणाच्या कवितेंत असलेल्या शद्बव्यूहांत
अर्थ शोधीत बसत नाही
वाहावल्या त्याच्या भावप्रवाहांत वाहत जातों
बुडी घेऊन पाहतों ठाव कुठे लागतो
चाचपडतात बुद्धीचे हात
तळचा गाळ उपसतात
त्यांना कांही मिळत नाही
अटकतात चरण मात्र अंतःकरणाचे असावधान
जीवनवेलीच्या तंतूने गुंफिल्या
बारीक मुळ्यांच्या कोवळ्या गुंतागुंतींत
सुटतां सुटत नाहीत पाय फसत जातात
आंत-बाहेर भिजून होऊन ओलाचिंब
पुन्हा येतां थडीवर
कांही जरी सापडलें नाही तरी
सार्थक होतें !

## पीक

पडूं दे हातीं हें पीक सारें बिचाऱ्यांच्या
राबले हे खूप बरें, माणसें नि गुरेढोरें
म्हातारी अन् लहान पोरें
उन्हींतान्हीं अनवाणी हिंडलीं हीं अर्धपोटीं
रानशेण्या गोळा करून भाजली ही लाल माती
हाडकुळे बैल-हेले जुतून केली भातशेती
नागव्याने कसूनशान लंगोट्या
तुडवली पावलांनी गारामाती
गुडघागुडघा चिखलामधे वाकवाकून दिवसभर
धानाच्या रोपट्यांची लावण केली
गाणीं म्हणत उरकली भराभर
वळवित नेलें पाणी आणि निंदण खुरपण करीत गेले वेळेवर
तेव्हा चार महिन्यांनी धान डोलूं लागलें
फुटून आल्या बाळ्या आणि लोंब्या लोंबूं लागल्या
दाणे भरूं आले, हलके हवेमधे फिरे वास
ओठावरती उमटली दिसूं आली भीरू आस
कष्टलेले प्राणी सारे पोटभर खातील घास
आता वाऱ्या वाहत राहा झुळझुळ असा हप्ताभर
उगा नको जोर आणूं, कोवळें हें धान नको मातीमध्ये लोळवूं
आणि ढगा येऊं नको करूं नको गारपीट
उडवून देऊं तिरपिट नको कापणीच्या भरावर
नका आणूं विघ्न कांही चाळे सारे बस करा
पंधरा दिवस धीर धरा
नेऊं द्या ह्यांना हें सुगीचें पीक घरा !

## कोंबडा

मालाच्या धक्क्यावर
पहाट झाली
धुरांतून, धुळींतून, वाफेंतून
करडीशी तेलकट

बासांच्या पट्ट्यांच्या पेटाऱ्यांत
कोंबलेल्या कोंबड्यांचा
सुरू झाला कुचकुचाट
धान्याच्या पोत्यांच्या, मिरच्यांच्या थैल्यांच्या
देवदारी खोक्यांच्या
उलट्यासुलट्या डागांच्या सोबतींत
गेली होती त्यांची रात
फुटणाऱ्या तांबड्याचा होऊन भास
आरवला त्यांतला एक कोंबडा
'कुकूऽच कू'

आरवण्यांत त्याच्या त्या
कातरतेने कापणाऱ्या आवाजांत
होती एक दुबळी हाक
खेड्यांतील विश्वाला
कौलारू घरांना
हिरव्यागार मळ्यांना
नाचणाऱ्या रोपटांना
डवरलेल्या झाडांना, झुडपांना

वेलींनी झाकलेल्या कुंपणांना
कणसें भरू आलेल्या जोंधळ्याच्या शेतांना
कणग्यांमधील दाण्यांच्या साठ्यांना
जात्याच्या घरघरीला
बारीकशा गळ्यामधून उमडणाऱ्या ओव्यांना
सड्याच्या शिवरांना
दारापुढच्या रांगोळ्यांना
आणि त्याच्या कोंबड्यांना—
अंडीं फोडून आलेल्या तलगांना
तुर्रा उडवीत ठुमकणाऱ्या शेजाऱ्याच्या कोंबड्याला

पिंजऱ्यांत कोंडलेल्या
एका कैदी कोंबड्याची
हाक ती !
आरवण्याचा आर्त रव !
पुसट पुसट होणाऱ्या
साऱ्या त्याच्या जगाचा त्यांत आठव !
कुणीकडून साद नाही
तरी पुन्हा आरवला एकवार
मरणाऱ्या रात्रींतून
मरणाचीच पहाट पाहत
कोंबडा ! !

# रंभागर्भ

वारा कुजबुजे
आकाश ऐकत होतें
रात्रीला थोडीशी लागे चाहूल
रंभागर्भातून बाहेर येतां
केळीचें फूल !

मिस्किल हासल्या प्राजक्ताच्या कळ्या
त्याहि तितक्यांत होत्या उमलल्या
गुलाब-मोगरे टपोर बिचारे
जाणतेपणाने झाले गोरेमोरे !
पावसाचे थेंब वेळींच आले
नव्या बाळाला न्हाऊं घातलें
नात्याची पण ती कर्दळीबाई
पंचरंगांचा बाळंतविडा
जरा आधीच घेऊन येई !

थोडी उशीराच पहाट आली
आणि पाहून विस्मित झाली
म्हणाली कांहीसा राग येऊन
कर्तेपणाचा आव आणून
"अगाई कशी नवलाई झाली
सुईण चतुर नसतांना मी
अशी अवेळीं
कशी केळ ही बाळंत झाली !"

## स्वप्नबीज

थोडी जाग थोडी नीज
अधांतरी स्वप्नांचें बीज
कांही ज्ञात कांही भ्रांत
किंचित् व्याकुळ किंचित् शांत
थोडी बाहेर थोडी आंत
किंचित् पहाट किंचित् रात
थोडी ऊब थोडें गार
केव्हा स्मित केव्हा सुस्कार
कांही धीट कांही भीत
थोडी हार थोडी जीत
अंमळ रुसवा अंमळ प्रीत
कांही गुणगुण कांही गीत
थोडी जाग थोडी नीज
अधांतरी स्वप्नांचें बीज !

# तटस्थ

अंधारी रात्र, सागरकिनारा
एकटाच मी, पडलेला वारा
कुणा न दिसतां अस्ता जाणारा
असाच एक अनोळखी तारा

उगीच थोडेंसें जळ चुळबुळे
मिसळत कांही निळ्यांत काळें
शिणून आणून तोंडाला फेस
वाळूच्या कणांना सांगत क्लेश

कुणीच कुणाला जाणत नाही
दिसतें तरीहि पाहत नाही
कानीं पडे पण ऐकत नाही
कुणीहि आपल्या भानावर नाही

निर्वेद क्षण हा रितेपणाचा
आपला आपण थांग घेण्याचा
तटस्थ मीहि, तटस्थ पसारा
अंधारी रात्र, सागरकिनारा !

# पाहतों हें सर्व आम्ही

पाहतों हें सर्व आम्ही जागच्या जागीं बसून
स्वस्थ आणिक शांत चित्तें
ह्या अधःस्तर जीवनाची लाज आम्हां येत नाही
पाहतों आम्ही भुकेले अस्थिपंजर
आंधळे, लंगडे, लुळे, अन् कुष्ठरोगी नागडे
पाहतों आम्ही खुराडीं
त्यांत वर्षाला विणाऱ्या दीन माता
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों व्यवसाय काळे पांढरे
चोरटे अन् उजळ उघडे रोजगार
कुंटिणींनी नाडल्या अज्ञान पोरी
लाचारिच्या गरजेंत विकणाऱ्या स्वतःला
एरव्ही सच्छील नारी
धूर्त पण मिष्ठास साठेबाज व्यापारी ठगांचीं
भव्य भांडारें, दुकानें
सट्टाइतांचे कारखाने, मोटरी, उंची हवेल्या
अन् रखेल्या
पाहतों अधिकार, सत्ता मत्त करिते
भ्रष्टवीते सात्विकांना मालमत्ता
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों कष्टांत शेती जोतणारे भूमिदास
जीवनाचा अर्थ ज्यांना दोन वेळां दोन घास
वाढतें लेंढार आणि पोसण्या असमर्थ माता
रोडकीं, रोगी, कदन्नीं वाढलीं निस्तेज पोरें,
माणसें, ढोरें-गुरें एकत्र निजणारीं घरें
सर्व खेड्यांचे करूनी शेतखाने राहणारे !
पाहतो हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों ही झुंड, झुंडीचे पुढारी पुंड, आणिक
खोपडी शाबूत फोडाया कुणाची
सज्ज दंडेबाज गुंडे
दहशतीने जें दिलेलें जीवदान
तेंच जीवन मानतों
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों !

पाहतों हें सर्व आम्ही
आणखीहि किति तरी वरचेवरी
ह्या अशांना अंत नाही
वैतागतो कोणी कधी जर तडफडून
सत्य बोलूं लागतो,
ऐकून तेंहि सर्व घेतों
स्वस्थ आणिक शांत चित्तें
जागचे जागीं बसून
पाहतों हें सर्व आम्ही—
साहतों ! !

## रानराणी

पावसा पावसा किती येशील ?
आधीच ओलेत्या रानराणीला
आणखी कितीदा भिजवशील ?

पावसा पावसा थांब ना थोडा
पिळून काढून न्हालेले केस
बांधूं दे एकदा सैल अंबाडा

पावसा पावसा लप ढगांत
सागफुलांची कशिदा खडीची
घालूं दे तंगशी चोळीं अंगांत

पावसा पावसा ऊन पडूं दे
वाळाया घातला हिरवा शालू
चापूनचोपून तिला नेसूं दे

पावसा पावसा पाहा ना जरा
जांभळ्या फुलांचा देवबाभळीने
वेणींत घालाया केला गजरा

पावसा पावसा आडोशांतून
साजरा शृंगार रानराणीचा
दुरून न्यहाळ डोळे भरून !

# कधीचें क्षितिज

कधीचें क्षितिज एकाग्र पाहतों
ध्यासिलें त्याचा न उदय दिसतो
आहे का सारें हें इतकें निश्चित
इतकें ग्रथित इतकें घटित ?

तेच ते खगोल त्याच त्या वेळेला
उदया येतात जातात अस्ताला
वाटतें आहे जें कांहीसें वेगळें
नियम अज्ञात तोवर आगळें !
नियतीमधून कांही न सुटलें
कशाला मुक्तीचें वेड हें घेतलें !

# आई

आठवतें आई फिरफिरून
प्रसन्न शांत तुझें वदन
मूर्तिमंत जणू तृप्त समाधान
विफल ज्यापुढे ज्ञानविज्ञान

आई तूं तुळशीपुढे बसून
काय पाहिलेंस डोळे मिटून
तुझ्या पांढऱ्या केसांमधून
परतलें कसें निवून ऊन ?

आई, तूं अती कष्ट उपसले
दुःखाचे किती मूग गिळले
तेढ्या वागणुकी सहन केल्या
शब्दांचे प्रहार वर झेलले
असा काय तुज परिस मिळाला
ज्याने केलेंस लोखंडाचें सोनें
कांहीहि नसतां हातांत कसें
पड्डं दिलें नाही कुणास उणें !

आणि तूं म्हणावें देवाने दिलें
सारें कांही मला माझ्या वाट्याचें
साऱ्यांचें सुख खूप पाहिलें
आता न मागणें कांही राहिलें

आई, तूं जीवनव्रत उजविलें
कशांत न मन गुंतून ठेविलें
सर्वांचें इच्छित सारखें भलें
साखर वाटून डोळे मिटले !

# आश्विन

आश्विन येतां एक वेगळा
सुवास हवेंत येउं लागतो
कशाचा कुठून कळत नाही
श्वासांत ओळख देत राहतो

आश्विन येतां खुलून दिसे
माळरानावर आगळी आभा
सहस्र भिंगांत कवडशांची
डोळे पाहतात किरणशोभा

आश्विन येतां निराळा रंग
दूरचे डोंगर घेऊं लागती
कोणता सांगतां येत नाही, पण
अंतरंगाला होते प्रचीति

आश्विन येतां देत राहतें
रात्रीस आभाळ नवी निळाई
अंतरवृत्तीचें गूढ संवेदन
जीव नकळत पिऊन घेई !

# विराणी

आभाळ खाली वाकलेलें मेघ काळे क्रूर
गुडघा गुडघा चिखल आणि ओढ्यांनाहि पूर
नुसता गडद अंधकार वीज चमकत नाही
काळी माती काळें रान मला मीहि दिसत नाही
हातीं दिवा होता त्याची कधीच विझून गेली वात
कशानेहि उजळत नाही अशी काळीकुट्ट रात
आहे ओळखीचें पुष्कळ, कांही दूर जवळ कांही
असून नसून सारखेंच मी कुठे हें कळत नाही
हारल्याची हरवल्याची जाणीव सलत राहते
अशा वेळीं काळोखांत विरून जावें वाटतें !

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र.

# तदात्मता

जेव्हा फुलांच्या पाकळ्यांवरी सूर्याचे किरण खेळूं लागती
आणि कळिकांच्या अंगाभोवती मायेची जाळी विणूं पाहती
केळींचीं कवळीं लुसलुशीत पानें हळुवार कुरवाळती
अमलताशाच्या फुलझुंबरांत शिरून पिवळे झोत पाडती
उसांच्या असंख्य तुऱ्यांवरती प्रकाशलहरी डोलत जाती
रुपेरी राखी रंगांच्या लाटा हिरव्या शेतांत उसळविती
दुर्वांकुरांच्या अग्रांवरती लाख टिकल्या उजळतात
कवडशांतून धूलिकणांच्या विश्वाचा विस्तार पाजळतात
तेव्हा संवेदना अबोध कांही तदात्मतेची थरारून जाते
प्रीतीचा पहिला स्पर्श जाणवून सारें अंगांग शहारून येतें !

# एक दिवस

जीव लागत नाही माझा असा एक दिवस येतो
कधी अधूनमधून केव्हा लागोपाठ भेट देतो
अशा दिवशीं दुरावलेलें उजाड सारें आसपास
घर उदास बाग उदास लता उदास फुलें उदास
वाटतें आयुष्य अवघें चार दिवसांचेंच झालें
कसें गेलें कळलें नाही हातीं फार थोडें आलें
दोन दिवस आराधनेंत दोन प्रतीक्षेंत गेले
अर्धें जीवन प्रयत्नांत अर्धें विवंचनेंत गेलें
आस हरपलेली असते श्वास थकले वाटतात
अश्रू बाहेर गळत नाहीत आंत जळत राहतात !

## आणीबाणी

अशा कांही रात्री गेल्या ज्यांत काळवंडलों असतों
अशा कांही वेळा आल्या होतों तसे उरलों नसतों
वादळ असें भरून आलें तारू भडकणार होतें
लाटा अशा घेरत होत्या कांही सावरणार नव्हतें
हरपून जावें भलतीकडेच इतकें उरलें नव्हतें भान
करपून गेलों असतों इतकें पेटून आलें होतें रान
असे पडत होते डाव सारा खेळ उधळून द्यावा
विरस असे झाले होते जीव पुरा विटून जावा
कसे निभावून गेलों कळत नाही, कळलें नव्हतें
तसें कांही जवळ नव्हतें—नुसते हातीं हात होते!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3१८२८ वि: काव्य
क्रमांक १५४५ नों: दि: २१/११/

## तळ्या काठीं

अशा एखाद्या तळ्याच्या काठीं बसून राहावें मला वाटतें
जिथे शांतता स्वतःच निवारा शोधीत थकून आली असते
जळाआंतला हिरवा गाळ निळ्याशीं मिळून असतो कांही
गळून पडत असतां पान मुळी सळसळ करीत नाही
सावल्यांना भरवीत कापरें जलवलयें उठवून देत
उगीच उसळी मारून मासळी मधूनच वर नसते येत
पंख वाळवीत बदकांचा थवा वाळूंत विसावा घेत असतो
दूर कोपऱ्यांत एक बगळा ध्यानभंग होऊं देत नसतो
हृदयावरची विचाराची धूळ हळुहळु जिथे निवळत जाते
अशा एखाद्या तळ्याच्या काठीं बसून राहावें मला वाटतें !

# खेळणीं

खेळणीं सुंदर लहानपणीं माझ्यापाशीं होतीं नाना तऱ्हेचीं
कांही पेरकुंडीं स्वतः केलेलीं कांही पितळी कांही लाकडाचीं
चिनीच्या भावल्या जरी नव्हत्या तरी होते दोन मातीचे बैल
कांही कळसूत्री करामती होत्या कमान ज्यांची पडते सैल
पुढे हातीं आल्या काचेच्या गोट्या भोवरे चक्र्या एक एकामागे
पतंग लहानमोठे उडवाया घोटले मजेंत मांज्याचे धागे
फोडलीं मोडलीं किती खेळणीं फुटून फाटून आपोआप गेलीं
थोडें रडूं आलें पण त्यांतूनच नव्यानव्याची हौस वाढली
खेळण्यांच्या जागीं खेळ आले आणि जीवनाचाहि खेळ झाला कांही
बाळखेळण्यांमधून मन अजून निघतां निघत नाही !

# पावसाळी सांज

इकडे मावळे पावसाळी सूर्य, तिकडे उगवे चंद्र पुनवेचा
दोन्हीहि निस्तेज झाकळलेले दोघांचीहि मंद किरणवाचा
धुंद वाऱ्याचीहि उतरलेली, हवा कुंद, नभ ढगाळलेलें
प्रकाशकवाडें बंद झालेलीं, ताऱ्यांचे काकडे विझवलेले
मिसळून गेले अंधुक आकार, क्षितिजाची रेघ पुसटलेली
घुंघट घेऊन तोंडावर लांब संध्या नकळत निसटलेली
मध्येच साशंक थबकली रात्र एकांतीं भिजलीं वस्त्रें वाळवीत
समेवर येतां थांबून राहिली पृथ्वी पूरियाचे सूर आळवीत
उघडझापींत ओल्या पापण्यांच्या दिसणारें शून्य मन पाहतें
एकीकडे उरीं भरून येतें, एकीकडे रितें होत राहतें !

## दोन वाटा

वाटचुकार वासराशिवाय फिरकलेलें कोणी नसतें
अशा जागीं गेली वाट सरत सरत आली असते
तिथे पुन्हा दोन वाटा फुटलेल्याच्या खुणा दिसतात
एक जरा सरावलेली दुसरीवरती ठसे नसतात
तिने चाहूल नाही म्हणून पाऊल पाऊल ओढून नेलें
सोडून दिल्या वाटेकडे फिरून फिरून पाहूं दिलें
किती वेळ दिसत होती धरली नाही तीच वाट
तिचीं वळणें, हेलकावे, तिचे उतार, तिचे घाट
तिनेच गेलों असतों तर ? ही कदाचित् मिटली असती
तसें व्हावयाचें नव्हतें—! हीच माझी वाट होती !

## जुई

पावसाची सर ओसरून जाते, उगाच तुषार भिरभिरती
इवल्या इवल्या फुलीं भरलेल्या अंगनिथळत्या जुईभवती
आधीच हळवा सुवास कोमळ त्यांत जळाआंत विरघळला
ओल्या झुळकींत भरून वारा नेत असतो, अशा वेळेला
तलम ढगांच्या सात घड्यांतून गाळीव पडतें सौम्य चांदणें
जाळीच्या पडद्यामधून दिसतें जुईचें नितळ रूप देखणें
कवळ्या फांद्यांचा लवचिक बांधा पाचूच्या पानांत झाकून घेत
शुभ्र शुचितेची सौजन्यकांति हिरवें लावण्य लेऊन येत
मादकता जाते मार्दवीं विरून, सौंदर्य सोज्वळाआड दडतें
सोलीव सुखाचें स्वप्नच एक जीवाला जागतेपणीं पडतें !

## श्रावणझड

श्रावणझड बाहेरी मी अंतरिं भिजलेला
पंखीं खुपसून चोच एक पक्षि निजलेला
अभ्रांचा हृदयभार थेंब थेंब पाझरतो
विझलेला लांब दिवस चिंब होत ओसरतो
उथळ उथळ पल्वलांत संगळून जळ बसतें
क्षणजीवी वर्तुळांत हललेंसें भासवितें
चळतें प्रतिबिंब जरा स्थिर राहुन थिजतांना
बिंदुगणिक उठलेलें क्षीण वलय विरतांना
झिमझिम ही वाऱ्यासह स्थायी लय धरुन असे
संमोहन निद्रेंतुन शब्दांना जाग नसे!

## शरदागम

आभाळ निळें नि ढग पांढरे हवेंत आलेला थोडा गारवा
कोवळीं सकाळ मनमोकळी धरातळीं रंग एक हिरवा
साचून राहिल्या गढूळ पाण्याचीं हळुहळू झालीं निर्मळ जळें
काठावर उभ्या राहून बाभळी वाकून पाहती रूप सावळें
टवटवलेलीं सारींच शेतें; ज्वारीच्या कुसेंत अधीर होत
टपोर गर्भ तान्ह्या कणसाचा पान-आडोशांत जन्मास येत
काळजी करते काळी माती कशी अजून कपाशी नाही फुलली
चौकशी कराया पंख हालवीत निळे तास पक्षी उतरती खाली
शेवंतीला कुणी उगीच सांगे इतक्यांत तुझी वेळ आली नाही
गवताचें सोनें होण्याआधीच पिवळ्या फुलांची नको करूं घाई !

## लावण्य

असें कांही तरी आगळें लावण्य केव्हा कधीकाळीं दिसून जातें
वेगळ्या सौंदर्य-पर्युत्सुक जीवा जन्मांतरींचें सांगत नातें
नसते निव्वळ गात्रांची चारुता त्याहून अधिक असतें कांही
ठाव त्याचा कधी लागत नाही आणि आठवण बुजत नाही
रूप रेखेंत बांधलेलें तरी मोकळी खेळते त्यांतून आभा
डोळ्याआडच्या दीपज्योतीहून निराळी भासते प्रकाशप्रभा
आधीच पाहिलें पाहिलें वाटतें पहिलेंच होतें दर्शन जरी
स्मरणाच्या सीमेपलिकडलें कुठलें मीलन जाणवतें तरी
पुन्हा तहानेले होतात प्राण, मन जिव्हाळा धाडून देतें
जागच्या जागींच राहून हृदय प्रीतीचा वर्षाव करून घेतें !

# एकाकी

स्वप्नांतल्या मुक्या सावलीसारखी दिसते अशी का आकृति तुझी
बोलत नाहीस, ऐकूंहि न ये का गळ्यांत दाटली हाक तुला माझी
खुणांनीच कांही सांगूं पाहसी किती होती त्यांचे अर्थ वेगळे
काय समजूं मी जोवर ठेविसी झाकून असे पापण्यांत डोळे
भिजल्या आहेत पाऊलवाटा आता साऱ्या तुझ्यामाझ्यामधल्या
मिटल्या आहेत जळावरल्या पुसट प्रकाशलाटा शेवटल्या
परतून गेले आहेत सगळे आठवणींचे पक्षी थकलेले
दूर कोठे तरी अज्ञात स्थळीं घरट्यांत आता गाढ निजलेले
आधारच तुझ्या पायाखालचा निघून गेला कसा एकाएकी
ज्यावर आहें मी अजून चालत तुझ्यावाचून वाट एकाकी !



निर्वासित
चिनी
मुलास

## निर्वासित चिनी मुलास

अजुनीहि नच हालती माझ्या दृष्टीसमोरून
कावरेबावरे भेदरलेले
तुझे ते डोळे
आंत कोंडलेल्या अश्रूंच्या दाबाने
सुजलेले आणि पुढे आलेले !
फुटणार जणू डोळ्यांचा बांध
आत्ता ह्याच क्षणीं
—त्याच्या पूर्वीचाच निमिषार्ध हा—
आणि वाहणार अश्रूंचा पूर
बेफाम वेगें हुंदके देत !

पराकाष्ठेची असहायता
मूर्तिमंत तूं चिमण्या बाळा !
किंचाळून कोणा माराया हाक
उघडिलेंस सोनुलें मुख
दाखवीत दूधदात आपुले ?
दूर तेथे कोठे दिसलें कोणी ?
"आई, अहो बाबा, दादा, ताई ग
हा मी येथे आहें
कसे तुम्ही मला सोडून गेलां ?"
असा आर्तस्वरें फोडीत टाहो
धाव घेणार तूं आत्ता त्याच्याकडे ?
चमकून त्या आशेची धडक
गेली का तुझ्या हृदयांतून

आणि राहिले डोईवरले
जावळे केसहि विस्फारून उभे ?
दुसऱ्या क्षणींच पण दिसलें
धडधडलें हृदय पुन्हा
धुकधुकी होऊं लागली क्षीण
"छे–नाहीत–ते–आई बाबा दादा
दुसरे कोणी...
अरे देवा रे !
कोठे शोधूं मी आता तयांना !"
असें ओरडून धाय मोकलीत
लोळण धुळींत गडबडा घेत
टाकिलेंस अंग धरणीवरी !

धरणीमाता...!
स्वर्गाहून गरीयसी अशी ती
तुझी जन्मभूमि !!
तीहि बिचारी
असहाय दीन तुझ्यासारखी
पददलित आक्रमिलेली
तुला पोटाशीं घेणार कशी ?
तिच्या जेत्यांनी
चिरून तिचें पोट त्याआंत
भरलीं आहेत तिचीं मृतबाळें
तिचे शूर पुत्र आणि शूर कन्या
तिच्यासाठी ज्यांनी देह ठेविला !

ऊठ ऊठ बाळा
रडून आता होणार कसें ?
कोण करणार तुला साहाय्य ?
दूर तुला जीं दिसलीं आता
नाहीत बरें तीं कोणी माणसें
आहेत तीं भुतें
साम्राज्याकांक्षेने उभीं केलेलीं
चेकाळलेलीं
—तूं ज्या बालपणीं ऐकिसी गोष्टी
त्यांतलेच हे क्रूर राक्षस
आलेत शोधीत नरबळींना
त्यांच्या पोलादी यंत्रदैत्यासाठी !
आणि बघ त्या राक्षसांहूनीहि
आहेत हे सारे अतिभयंकर
ह्यांना ना हृदय अथवा डोकें
आहेत सारीं हीं जिवंत धडें
धडधडणारीं यंत्रांसारखीं
पोलादी बाहुलीं कळसूत्रांचीं—
सैनिक हे तुझ्या शत्रुराष्ट्राचे !
तुला जे वाटले आपले आप्त
आहेत दुसरीं कोणी माणसें
तुझ्या देशाचींच कैद केलेलीं
आहेत त्यांना घेऊन जात
वधस्थलाकडे !
चल काढ आता येथून पळ
चिमण्या पायांत शक्ति ना जरी
लपून राहा कोठे रानींवनीं

दृष्टीसहि ह्यांच्या पडूं नको बरें !
नाही तर हे नरराक्षस
तुलाहि घेऊन खास जातील
काढून घ्यायाला तुझ्या अंगांतील
तान्हें रक्तहि !
पाहिजेच आहे तेंहि तयांना
त्यांच्या शस्त्रहत सैनिकांसाठी
टोचीं द्यायाला !!

अरे, पोरक्या चिनी बालका !
घरादारांना पारखीं झालीं
सोडून दिलीं आईबापांनी
ताटातूट झाली अशीं हीं किती
आहेत बालकें तुझ्यासारखीं
भटकत वणवण निर्जनांत !
सहस्रांनी आहे गणना त्यांची
कित्येक बिचारीं अन्नपाण्यावीण
आक्रंदत आणि तडफडत
रडत मेलीं !!

बाळा, तुझ्या त्या आईबापांना
दोष देशी का ?
नको नको बरें !
नाही का माहीत काय झालें तें ?

तुझ्या गावावर पातली जेव्हा
शत्रूची धाड

धाडधाड पडूं लागले गोळे
तुझा पिता तेव्हा
सुपुत्र आपल्या मायभूमीचा
तुझ्या देशाच्या शूर सैन्याला
कराया मदत शक्य ती सर्व
धावून गेला
घेऊन हातांत स्फोटक गोळे
मिळेल तें शस्त्र
लपतछपत वृक्षयुद्धांत
जर्जर करीत शत्रुसैन्याला
कित्येक जे होते सरसावत
लुटीच्या आशेने लालचावले
लोळविलें त्याने तेथेच त्यांना
...पण दैवगति !
दिसला तो एका नेमबाजाला
अचूक धरून निशाण त्याने
सोडिली गोळी
थेट डोक्यांतच शिरली त्याच्या !
लख्कन् त्या शेवटच्या क्षणीं
दिसली त्याला
तुझी आई आणि तुम्ही सर्वहि
—आणि तूंहि बरें !—
आणि गेला त्याचा प्राण निघून !
शरीराची माती
मातींत पडली त्याच्या देशाच्या !!

तुझी माता, बाळा...!
तशा भयंकर रणकंदनांत
हातघाईच्या कापाकापींत
फिरतच होती स्वयंस्फूर्तीने
घायाळ लोकांना वाहून नेत
शुश्रूषास्थलीं...
कित्येक तिने वाचविले जे
पडले होते तडफडत
गडगडत्या रणगाड्याखाली
चिरडून जे असते मेले...
अशाच एका
पाठीवरती वाहून नेतां
क्लांत झालेली ती पडली खाली
मूर्च्छा येऊन
चुराडा करीत दोघांचाहि त्या
रणगाडा गेला धुमश्चक्रींत!
अरे! जे तुम्ही
तिच्या जीवनाचें सर्वस्व होतां
त्यांच्या आठवाचें अंतिम सुख...
तेंहि न मिळालें तिच्या जात्या जिवा!

तुझे ताई-दादा
तुमच्या दुर्दैवें विजयी होतां तुमचा शत्रु
प्रतिकार तेव्हा सर्व थांबला
भेसूर सर्वत्र झाली सामसूम
धुंद झालेले जेते शिपाई
गल्लीगल्लींतून हिंडूं लागले

शोधीत सैतानी वासनातृप्ति !
नुकतेंच जिने यौवनांत होतें केलें पदार्पण
अशी तुझी ताई !
हुडकून त्यांनी काढली तिला
तुझ्या घरांतून...
तुझ्याहून मोठा थोडासाच तो
तुझा दादा दहाबारा वर्षांचा
उसळलें त्याचें पोररक्तहि
धावून गेला त्यांच्या अंगावर
"खबरदार ! सोडा ताईला
लावाल जरी अंगाला हात..."
"काय करणार कारट्या रे तूं ?"
दात विचकीत हासले सारे
मुर्दाड शिपाई...
घेऊन गेले दोघांनाहि कोठे
ओढत आणि फरफटत
अज्ञात स्थलीं !
तुला कसें सांगूं—पुढे काय झालें... !

लपवून तुला ठेविलें होतें
त्यांनी ज्या जागीं
राहिलास तूं तेथेच बाळा !
तुलाहि नेतील पकडून ते
वाटून अशी मनास भीति
त्यांनी नाही तुला हाकहि दिली
नुसतें पाहिलें आकाशाकडे !

कोसळलें तें आकाशच आता
तुझ्यावरती!!

वाट पाहून कंटाळलेला
आणि भ्यालेलाहि एकटेपणें
आलास तेथून बाहेर जेव्हा
कानोसा घेत
भिरभिर भेदरल्या डोळ्यांनी
रिकाम्या घराचे कोनेकोपरेहि धुंडाळिलेस
"आं—कोणीहि नाही—कोठेहि नाही!
गेले तरी कोठे सारे येथून
सोडून मला..."
आणि नंतरचा तुझा आक्रोश
—चिमण्या पिलांची घरट्यांतल्या
माय कोठे दूर गेली असतां
पडली कोणाच्या छर्‍याला बळी
घरीं न परते सांजवेळेला—
पिलांचा जसा चिवचिवाट...

चेकाळून त्या आक्रोशांतच
सुटलास सैरावैरा पळत
जिकडेतिकडे पाहिल्यास तूं
आगी लागलेल्या
कानांत भरून भीतीचें वारें
पळालास धूम
अंधाराचीहि वाढत्या नाही
वाटली भीति

जळत्या घरांच्या उजेडाची जशी !
दूर एखाद्या दरडीमध्ये
काढिलीस रात्र
नीज आली अर्धमेल्यासारखी...
कशाला आता आला तुला जाग ?
कोणती सकाळ दिसणार आता
तुला जीवनाची ?
कोणता दिवस उजाडणार
तुला आशेचा
आणखी उज्ज्वल भवितव्याचा ?

अशीच झाली ना बाळा तातातूट
तुझी आणि तुझ्या आईबापांची
ताई-दादांची ?
की कोणी होते ते भ्याड नादान
की जे स्वप्राणा कवडीमोल वाचवावया
मरणाआधीच मृत झालेले
पळाले तुलाहि सोडून मागे
पोटच्या पोरा
"प्राण सलामत आपले तरी
पन्नास पोरें"
असा करीत षंढ विचार ?
असोत तसेहि !
तयांनाहि देऊं नकोस दोष
जीवन आहेच सर्वांना प्यारें
असो शूराचें, असो भ्याडाचें !
तशीच आहे जीवनशक्ति...!

अरे ! जीवनाचा एकेक क्षण
पृथ्वीवर ह्या जो लाभतो आहे
आहे तोच आत्यंतिक मोलाचा
शूरांनाहि हें पटतें अखेर
प्राण जातांना !
उन्मत्तपणें हें जीव घेणें देणें
मांडतात जे
त्यांचींच आधी सडकून डोकीं
जग नांदेल कधी धडपणें ?...

दोष तरी तूं द्यावा कोणाला ?
कोण ह्या तुम्हां बालकांचे खरे
घोर अपराधी
ठाऊक नाहीत बाळा ते तुला !

अरे ! ते ऐदी ऐषआरामांत
बसलेत प्रास तूपपोळी खात
लोळत सोन्याच्या मंचकावरी
तुझ्या देशाची पेटवून होळी
भाजून त्यावर पोळी आपली
विकून तुझ्या शत्रूंना गोळ्या
माखल्या त्यावर तुपाने पोळ्या
युद्धसामग्रीचा प्राणघेऊ ज्यांनी
व्यापार केला
मिळविलें ज्यांनी अपरंपार
सुवर्णधन
आणि त्यावर प्राण पुष्ट केले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 38८२७ वि: काव्य
क्रमांक १४८५ नों दि: २९।७

केला गारीगार तळीरामहि
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना!

अरे! जे घोकीत शांततापाठ
निर्लज्ज शठ
उभा करूनी पोकळ देखावा
जगदैक्याचा राष्ट्रसंघांत
बसले होते आपला केवळ स्वार्थ साधत
बोलत गोष्टी शस्त्रसंन्यासाच्या
निव्वळ ओठें
गुपचूप होते वाढवीत नित्य
संहारशक्ति शस्त्रें आयुधें
आणि डोळ्यावर कातडें ओढून
दुर्लक्षीत होते त्यांच्या जे लीला
हेतु ठेवूनी वेगळा कांही
आणि ज्यांच्या जिभा
टाळूलागीच चिकटून गेल्या
होतां आक्रमण तुझ्या देशावर
बहिरे झाले जयांचे कान
आपलें द्रव्यच मोजीत पुन्हा
हात राहिले खिशांतच ज्यांचे
त्यांच्या इजारींच्या
तुझ्या देशाच्या गळ्याला लागला असतां फास
सोडीत होते जे नुसते श्वास
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना!

अरे ! ती तुझी मृत सम्राज्ञी
तुझ्या देशाच्या दौलतीचा जिने
गरिबांपासून पिळून काढल्या करभाराचा
रंगेल केला कलाविलास !
बांधायासाठी युद्धनौका जो
पंतप्रधानाने पैसा वाचविला
त्याच पैशाने
हस्तिदंती जिने घडविली छान
आरामनौका !
चिनी कौशल्याचा ताजमहाल
मोत्यांच्या झालरी आणि रत्नांचे
चित्रबंध जींत
सोन्यांत केलेलें काम मिन्याचें
घडवीत होते अत्यंत कुशल
कारागीर जी कित्येक मास
अशी ती नौका
सम्राज्ञीच्या शाही तलावांत जेव्हा
फिरूं लागली
पंतप्रधानाने पाहून तिला
मारून घेतला कपाळीं हात
उद्वेगाने आणि बोलला, "अहो !
उद्या जरी चाल करून आलें
बलाढ्य जपानी आरमारहि
आमच्या महासाम्राज्ञीचें हें
कलाढ्य सुसज्ज रम्य आरमार
मुकाबला छान करील त्याशीं
कशाला काळजी बचावाची आता ?"

असे जे नादान सम्राट तुझे
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

आणि युद्धदेव तुझ्या देशाचे
ज्यांनी आपल्या स्वार्थी आकांक्षा
पूर्ण कराया
सर्वसत्ताधारी व्हायाच्या उन्मत्त ईर्षेने ज्यांनी
माजविलीं रणें आपसांतच
एका हाताने कापिला ज्यांनी
देशाच्या देहाचा दुसरा हात !
अंदाधुंद लूटमार करूनी
संपन्न भूमीचें वैराण रान
जयांनी केलें
निजबांधवांच्या रक्ताचे लोट
वाहवून ज्यांनी
त्यांच्याच भूमीला स्नान घातलें
घालीत अखेर लोटांगणें आणि
शत्रूलाहि जे शरण गेले
त्याच्या बळावर प्रबळ व्हाया
तुझ्या देशाचें मनुष्यबळ
हतबल ज्यांनी स्वतःच केलें
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

आणि जे लढत असतां देश
चढत आहेत सिंहासनावरी

शत्रूने घेतल्या मुलुखाचे जे
उल्लूक बनत आहेत राजे
पुत्रक-नृप
तुझ्या देशाच्या ध्वजावरल्या
माध्यान्हसूर्याचा प्रकाश ज्यांना
पाहावेना क्षणभरहि डोळां
शत्रूच्या कृपाप्रसादाचा ज्यांना
बंदीखानाहि वाटे प्रासाद
त्यांच्याच अखंड मायभूमीचीं
खांडकीं करून शत्रूने जरी
टाकलीं हाडकें ह्यांच्या समोर
तींहि चघळीत आहेत जे श्वान !
तेच तुझे खरे घोर अपराधी
दोष दे त्यांना !

आणि दे दोष आम्हालागीहि
आम्ही जे तुझे शेजारी आहों
चाळीस कोटींचा विस्तार ज्यांचा
नुसताच भार भूलागीं असे
परिस्थितीचे दास जे आम्ही
साहाय्यास तुझ्या येऊं न शकूं
हिमालयाहूनि आहे जयांच्या
थंड हृदयांचा पर्वत मोठा
तुझ्या देशांतील आगेची आच
अजूनीहि जया नाही लागली
आणि जयांची प्रवृत्तिगंगा
अजून आहे मानसांतच

गारठलेली
वाट पाहत न जाणे कोण्या
भगीरथाची...!

हें जीर्ण जग!
जगत आहे जें जगूं न देतां एकामेकांना
असतां विपुल सर्वांना जागा
पृथ्वीच्या पाठीं नांदाया सुखें
जमिनीसाठी दुसऱ्यांच्या जें
हपापून आहे लढत नित्य
कमीनपणें
मरत आणीक करीत सर्वांना
जमीनदोस्त!
संपन्न समृद्ध असतां सृष्टि
जीवनोपयोगी धनधान्याने
माजविली आहे कृत्रिम ज्यांत
उपासमार
पिकवायाची फिकीर न ज्या
विकायाची मात्र अशा चोरांनी
गळेकापूंच्या चढाओढींत...
मानीव मोलाच्या सुवर्णालागी
मानवी प्राणांपेक्षाहि मोल
विकत घेतात मौक्तिक जेथे
कीटकजन्य
श्रमजन्य घर्मबिंदूंचे मोती
मातीमोलाने
आणि दगडांच्या पोटचीं रत्नें

यत्नावीण घेती सवंग अशा
कष्टोपजीवींच्या उत्पादनाला...
अर्थशास्त्राचा अनर्थ असा
चालला ज्यांत
प्रमत्तांच्या हातीं ज्यांतील सत्ता
अक्कल गहाण भांडवलांत
त्या जीर्ण जगा
अवास्तवाला कवटाळल्याची
झिडकारल्याची आणि वास्तवाला
ही घोर शिक्षा
भेसूर युद्धाची
जेत्यांना आणि पराजितांना
उभयतांनाहि मरावयाची !

होवो तरी आता एकदाचा त्या
जीर्ण जगाचा
आणि अमानुष मरणोन्मुख
संस्कृतीचा त्याच्या सर्वंच त्याच्या
निःशेष अंत !
खंत नच त्याची आता आम्हाला
गाळायास नाही एकहि अश्रु
आहोंत आम्ही करीत गोळा
लाकडें त्याच्या सरणासाठी
अधीर झालेले आहोंत किती
पेटवायाला तयाची चिता...
चिंता हीच की
ठरो हें युद्ध शेवटचें त्याचें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३१८२८ वि: काव्य
क्रमांक १५८५ नों दि: २१।१


अखेरचीच त्याची धडपड
चुकूनहि नच ह्यांतून वाचो!!

त्या जीर्ण जगाच्या चितेंतूनच
उडणार आहे अमर पक्षी
नव्या स्थितीच्या नव व्यवस्थेच्या
नव आदेशाचा नवाकांक्षांचा
घेत जगदंड स्वपक्षांखाली...
नाही तो कोमल कपोतदूत
युद्धान्ताच्या आणि उद्भवणाऱ्या
त्यांतूनच नव्या युद्धारंभाच्या
मध्यकाळांतील दुबळी शांति
घुमविणारा...
युद्धाचें निमित्त मतंगज जे
त्यांना उचलून स्वपंज्यांमध्ये
दूर अंतराळीं भिरकाविणारा
आहे तो प्रबळ शांति-भिरुंड
नव्या जगाचा!

नवें जग जें
जागणार आहे जन्मून आता
स्वातंत्र्य-समता-बंधुत्वाच्या तें
बोलणार नाही बोबड्या गोष्टी
वास्तवतेचा सर्वस्वतेचा
आणि निकराचा बंधुभाव जो
कणाकणांतून नव्या रक्ताच्या
मानवतेच्या नाचवील तें

उसळेल तो चेतना देत
नव्या शक्तींना
निर्मितील ज्या सम अर्थाचें
नवें सामर्थ्य
उपभोगील जें सारखेपणें वाटून घेत
सर्वांची सृष्टि
कृपाप्रसादाचीं फळें आणि तिच्या
सेवेचे कष्ट !

नवें जग तें...!
ज्यांत न होतील मानव धनी
अथवा दास मानवांचेच
परकष्टावर पुष्ट व्हायाला
ज्यांत ना जागा
मात्र भरपूर सहश्रमाच्या
सहजीवनांत नांदावयाला
विक्रम जेथे न म्हणेल कोणी
पराक्रमाला आक्रमकांच्या
मिळेल ना त्याला कोठेहि थारा
आणि मानवाला बांधावयाला
चीनच्या भिंती
उरेल न भीति मानवांचीच
संहाराचे शोध लावे जी बुद्धि
करील ती उभा सर्वांच्यासाठी
मानवहिताचा समाहाराचा
नवा संसार !!

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32420 वि: काव्य
क्रमांक 1484 नों दि 28.11.91

तें जग नवें

बाळा, तुझ्या ह्या आर्त हाकेने
व्याकूळ होऊन येणार आहे
सांभाळ कराया सदाचा तुझा
त्यांतच आहे उजाडणार
दिवस तुला
आशेच्या उज्ज्वल भवितव्याचा
धीर धर थोडा !
घेणारच आहे तुला तें पोटीं
तूंच त्यांची शक्ति
आणि उमाळा...
तुझ्याचसाठी
बाळा, ह्या नवीन जगाच्या गोष्टी
हीं तुम्ही बाळें
तुम्हीच आहां नांदणार त्यांत
आणि तयाला नवीनपणांत नांदविणार !
—येणारच आहे—येतच आहे—
—आलेंच पाहा !—
तें नवें जग...
नवें जग तें नव आशांनी हासविणारें
क्षणभरहि साहणार नाही
पाहणार नाही तुझे हे डोळे
असे भ्यालेले
पूस आता आसूं आणि हास बरें !
—नको—नको—पण—थांब—थोडासा
पाहूं दे पुन्हा ह्या जीर्ण जगाला
आपल्या आसुरी कर्मांचीं फळें

कावरेबावरे भेदरलेले
ते तुझे डोळे!!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 39626 वि: काव्य
क्रमांक 8484 नों दि: 29.1.91

परिशिष्ट १

# कविपरिचय

आत्माराम रावजी देशपांडे 'अनिल'
जन्म, ११ सप्टेंबर १९०१

प्रकाशित साहित्य

फुलवात, १९३२ : १९२० ते १९३१मध्ये लिहिलेल्या भावगीतांचा संग्रह

भग्नमूर्ति, १९४० : १९३५मध्ये लिहिलेलें दीर्घकाव्य

निर्वासित चिनी मुलास, १९४३ : मार्च १९४२मध्ये लिहिलेलें दीर्घकाव्य

पेर्तेव्हा, १९४७, दुसरी आवृत्ति १९५९ : १९३२ ते १९४६ मध्ये लिहिलेल्या भावगीतांचा व मुक्तछंदाचा संग्रह

अध्यक्ष : मराठी साहित्य संमेलन, मालवण, १९५८

परिशिष्ट २

## टिपणें : निर्वासित चिनी मुलास

स्फोटक : हँड ग्रेनेड्स

नेमबाज : स्नायपर

रणगाडा : टँक

मृतसाम्राज्ञी : डॉवेजर एम्प्रेस लँग यू

युद्धदेव : वॉर लॉर्ड्स

पुत्रक-नृप : पपेट किंग्ज

अमरपक्षी : फीनिक्स

शांति-भिरुंड : 'गंड-भिरुंड' ह्या मूळच्या शब्दावरून. 'गंड-भिरुंड' हा एक भारतियांचा काल्पनिक प्रचंड पक्षी आहे. हा एवढा प्रचंड पक्षी आहे की, एका पंजांत दोन-दोन हत्ती धरून उड्डाण करीत आहे, असें ह्याचें चित्रण असतें. ह्याचें चित्रण जवळपास म्हणजे रामटेकच्या पुरातन अवशेषांवर पाहावयास मिळेल. गंड-भिरुंड हा शब्द मूळचा कानडी असावा.

REFBK-0011984
REFBK-0011984

## कवितांचा कालानुक्रम

| | | | |
|---|---|---|---|
| १. | रुसवा | ५-८-१९४७ | यवतमाळ |
| २. | स्वातंत्र्यचक्रप्रवर्तन | १५-८-१९४७ | यवतमाळ |
| ३. | अर्घ्य | —८-१९४७ | यवतमाळ |
| ४. | १९४७ | —१०-१९४७ | यवतमाळ |
| ५. | आज अंधारी रात आहे | १८-२-१९४९ | नागपूर |
| ६. | आम्ही | —७-१९४९ | नागपूर |
| ७. | प्रणाम | —८-१९४९ | नागपूर |
| ८. | ओळख | —८-१९४९ | जबलपूर |
| ९. | गाठ | ३०-७-१९५२ | वर्धा |
| १०. | सारेच दीप कसे मंदावले आता | १५-८-१९५२ | वर्धा-नागपूर |
| ११. | पर्यंत | २०-९-१९५२ | दिल्ली-नागपूर |
| १२. | अंत | —१०-१९५२ | नागपूर |
| १३. | तहान | ४-३-१९५३ | मुंबई-दिल्ली |
| १४. | अभिसार | —८-१९५३ | दिल्ली |
| १५. | जाग | २१-८-१९५३ | दिल्ली |
| १६. | आंत | १३-९-१९५३ | नीलोखेडी |
| १७. | झोप | १-१०-१९५३ | दिल्ली-नागपूर |
| १८. | मेघांची भूमि | १६-१०-१९५३ | नागपूर |
| १९. | ओढ | ५-११-१९५३ | रांची-नागपूर |
| २०. | स्वप्नें | —३-१९५४ | दिल्ली-नागपूर |
| २१. | हुरूप | १७-११-१९५४ | नागपूर |
| २२. | क्षणभर | —१२-१९५६ | दिल्ली |

| | | |
|---|---|---|
| २३. अर्थ | ६-५-१९५७ | नागपूर-मद्रास |
| २४. पीक | ९-५-१९५७ | मद्रास-नागपूर |
| २५. कोंबडा | २३-१०-१९५८ | दिल्ली-पुणें |
| २६. सांगाती | २७-१०-१९५८ | मुंबई-दिल्ली |
| २७. रंभागर्भ | २८-१०-१९५८ | मुंबई-दिल्ली |
| २८. स्वप्नबीज | —१२-१९५८ | दिल्ली |
| २९. तटस्थ | ८-२-१९५९ | दिल्ली-नागपूर |
| ३०. पाहतों हें सर्व आम्ही | १३-२-१९५९ | मुंबई-दिल्ली |
| ३१. रानराणी | | |
| ३२. कधींचें क्षितिज | —१०-१९५९ | दिल्ली |
| ३३. आई | ६-११-१९५९ | दिल्ली-नागपूर |
| ३४. विराणी | ७-११-१९५९ | दिल्ली-नागपूर |
| ३५. आश्विन | ८-११-१९५९ | नागपूर-दिल्ली |
| ३६. तदात्मता | ९-११-१९५९ | नागपूर-दिल्ली |
| ३७. एक दिवस | १-१-१९६० | नागपूर-दिल्ली |
| ३८. आणीबाणी | २२-३-१९६० | दिल्ली-मुंबई |
| ३९. तळ्याकांठीं | २५-३-१९६० | मुंबई-दिल्ली |
| ४०. खेळणीं | २-७-१९६० | मुंबई-दिल्ली |
| ४१. पावसाळी सांज | १०-७-१९६० | नागपूर-दिल्ली |
| ४२. दोन वाटा | —८-१९६० | मुंबई-दिल्ली |
| ४३. जुई | १५-८-१९६० | मुंबई-दिल्ली |
| ४४. श्रावणझड | १६ व २०-८-१९६१ | |
| ४५. शरदागम | १५ व १६-९-१९६१ | |
| ४६. लावण्य | १९ व २०-९-१९६१ | |
| ४७. एकाकी | २२-९-१९६१ | |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११९८८